म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५८०

# काव्यदर्शन

REFBK-0012715
REFBK-0012715

ग्रं. सं. ठाणे
१५६०

मंगेश पाडगांवकर
वसंत बापट
विंदा करंदीकर

# काव्यदर्शन



आजच्या मराठी काव्यरसिकाला
वसंत बापट, मंगेश पाडगांवकर आणि विंदा करंदीकर
हे त्यांच्या मुद्रित काव्यसंग्रहांमुळे तर
परिचित आहेतच; परंतु काव्यवाचनाच्या
आपल्या कार्यक्रमांमुळें कवितेंतील सौंदर्याची
एक वेगळीच प्रतीति त्यांनीं रसिकांना दिली आहे.
काव्यवाचनाच्या मैफलींत
हमखास रंगणाऱ्या त्यांच्या निवडक कविता
या संग्रहांत प्रथमच एकत्र
येत आहेत....

## वसंत बापट

जन्म : १९२२.

शिक्षण : पुणें.

व्यवसाय : नॅशनल कॉलेज, बांद्रा, मुंबई ५०, येथें मराठी व संस्कृतचे प्राध्यापक. 'साधना' साप्ताहिकाचे एक संपादक.

साहित्य : बिजली; सेतु; अकरावी दिशा.

## मंगेश पाडगांवकर

जन्म : १९२९.

शिक्षण : मुंबई.

व्यवसाय : मातुःश्री मिठीबाई कॉलेज, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ५६, येथें मराठीचे प्राध्यापक.

साहित्य : धारानृत्य; जिप्सी; छोरी; शर्मिष्ठा; उत्सव; निंबोणीच्या झाडामागें.

## विंदा करंदीकर

जन्म : १९१८.

शिक्षण : कोल्हापूर.

व्यवसाय : एस्. आय्. ई. एस्. कॉलेज, शीव, मुंबई २२, येथें इंग्रजीचे प्राध्यापक.

साहित्य : स्वेदगंगा; मृद्गंध; धृपद; राणीची बाग; एकदा काय झालें; ऑरिस्टॉटलचें काव्यशास्त्र, स्पर्शाची पालवी.

# काव्यदर्शन


वसंत बापट

मंगेश पाडगांवकर

विंदा करंदीकर



दा. क्र. १२८९५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम ३२९०० वि: काव्य

क्रमांक १५८० नों. दि.

REFBK-0012715

REFBK-0012715



पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

*कवितांचे सर्व हक्क*
*त्या त्या कवीकडे आहेत.*

प्रथम मुद्रण : १८ नोव्हेंबर १९६२
कार्तिक कृ. ७, १८८४

मुद्रक : **वि. पु. भागवत**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक : **सदानंद ग. भटकळ**
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४

# वसंत बापट


- बिजली
- दख्खनची राणी...
- केवळ सौंदर्य केवळ आनंद
- नकळत तुमचे डोळे वळले
- झेलमचे अश्रू
- जायचेंच ना
- सेतु
- फुंकर
- विस्मृति
- आज अचानक
- बाभुळझाड
- एक डोळा आणि एक डोळा
- केवळ माझा सह्यकडा
- रंगानें तूं गव्हाळ
- नाजुक रुपडें



वसंत बापट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

## विजली

बिजली नाचेल गगनांत   वादळ होईल जोसांत
जंगल जळेल वणव्यांत   मंगल होईल देशांत
बिजली कडाड गर्जेल   पाउस धडाड येईल
पाउस चढेल शहरांत   पाणी जिरेल शेतांत
बिजली वरून कोसळते   सावध हवेलि ढांसळते
जाइल हवेलि मातींत   घरटं राहील शाबूत
बिजली कुणाला जाळील   बिजली कुणाला उजळील
बिजली येईल अवचीत   न्याय करील जगतांत
बिजली कुठून येईल ?   वादळ कुठून होईल ?–

शेतकऱ्यांच्या शेतामधुनी, औतं फिरती, जमीन खणती,
लाख ऐरणी–घण खणखणती, घरांत घरघर जातीं फिरती,
भिंति लिंपती, मळे शिंपती, विळे चालती, विटा भाजती,
पाठीवरुनी पाट वाहती, कैक करवती कुरकुर करती,
मडकीं घडती, चिखल तुडवती, कोणी विणती, सारे कण्हती
या औतांतुन, हातोड्यांतुन, या जात्यांतुन, या पात्यांतुन
या दात्यांतुन, या भात्यांतुन, या कामांतुन, या घामांतुन

या अश्रूंतुन, या अग्नींतुन

—ठिणगी फुटेल जोसांत   येइल विजेच्या वेषांत
बिजली नाचेल गगनांत   वादळ होईल जोसांत

वसंत बापट

## द ख्ख न ची रा णी ....

दख्खनराणीच्या बसून कुशींत
शेंकडों पिलें हीं चाललीं खुषींत
सुंदर मानव तुंदिल अंगाचे
गालींचे गुलाब शराबी रंगाचे
फेनिल मृदुल रेशमी वसनीं
ठेविल्या बाहुल्या बांधून बासनीं

गोजिरवाणीं लाजिरवाणीं

पोरटीं घेऊन पोटाशीं, कुशींत
दख्खनराणी ही चालली खुषींत

निसर्ग नटला बाहेर घाटांत
पर्वत गर्वात टाकले थाटांत
चाललें गिरीशमस्तकांवरून
आकाशगंगांचें नर्तन गायन
झेलून तयांचे नूपुर घुंगुर
डोलती डोलांत दूर्वांचे अंकुर

मोत्यांची जाळी घालून भाळीं

रानची चवेणी जाहली प्रफुल्ल
दख्खनराणीला नव्हती दखल !

'ड्यूकचें नाकाड' सरळ अजस्र
राहिलें उभें हें शतकें सहस्र
त्याच्याहि पाषाणहृदया कळाली

सृष्टीची शोभा ही वृष्टींत वेगळी !
पाहून वर्षेचा आनंद–विलास
उल्हासें धांवत नाचते 'उल्हास'

सौंदर्य पाहून अमृतें नाहून

बाभळी–बोरींना रोमांच फुटले !
दख्खनराणीला कौतुक कुठलें !

दख्खनराणीच्या कुशींत पोटांत
बुडाली जाणीव चहाच्या घोटांत
सोडती चिरूट धुराचे फवारे
न्याहाळी नजर रंगीत चेहरे !
रूजच्या रंगांत रंगलीं अंतरें
लटक्या हास्याचीं वाजतीं घुंगुरें

लाडीक बोल कृत्रिम फोल

मोहांत हृदयें गुंगलीं निवांत
दख्खनराणीच्या कुशींत पोटांत

बाहेर, भातांची हिरवी पिवळी
सोनेरी पोपटी माया ही आगळी
पांखरें पांढरीं गिरकी घेऊन
रांगोळी काढिती मधून मधून
निळा तो तलाव, तांबूस खाडी ती
पांढरा प्रपात, हिरवी झाडी ती

डोंगराकडे पीत केवडे

अंवतीभंवती इंद्राचीं धनुष्यें
दख्खनराणींत मुर्दाड मनुष्यें

नटीच्या फोटोंत जवान मश्गुल
प्रेयसी करिते कानांत किल्बिल
किल्वर चौकट इस्पिक बदाम
फेंकीत फेंकीत जिंकिती छदाम!
नीरस पोकळ वादांचे मृदंग
वाजती उगाच खमंग सवंग

खोलून चंची पोपटपंची

करीत बसले बुद्धीचे सागर
दख्खनराणी ही ओलांडी डोंगर

धांवत्या बाजारीं एकच बालक
गवाक्षीं घालून बसलें मस्तक
म्हणालें, 'आई ग, धबधबा केवढा
पहा ना चवेणी, पहा ना केवडा
ढगांच्या वाफेच्या धूसर फेसांत
डोंगर नाहती पहा ना टेसांत'

म्हणाली आई, 'पुरे ग बाई!'

काय या बेबीची चालली कट्कट
दख्खनराणीचा चालला फुंफाट

दख्खनराणीच्या कुशींत पोटांत
शेंकडो पिलें ही चाललीं थाटांत
मनानें खुरटीं, दिसाया मोठालीं
विसाव्या तिसाव्या वर्षींहि आंधळीं !
बाहेर असू दे ऊन वा चांदणें
संतत धार वा धुक्याचें वेढणें

ऐल ते पैल शंभर मैल

एकच बोगदा मुंबई–पुण्यांत !
दख्खनराणी ही चालली वेगांत...

## केवळ सौन्दर्य केवळ आनंद

केवळ सौन्दर्य केवळ आनंद

सागरनभाचें बिंबप्रतिबिंब
माळावर संध्यारंगांचे तरंग
अंवसेच्या घरीं नित्याची दिवाळी
सूर्यात जळती ताऱ्यांचे पतंग
सोनेरी शेतांत राघूंची भरारी
प्रश्नचिन्हांपरी पर्वत अभंग

कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

निसर्गानें दिला आनंदकंद
केवळ सौन्दर्य केवळ आनंद !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38700 विः

छंदीफंदी झरे गातात तराणे
प्रेमी पवनाचें फिर्यादीचें गाणें
रानपांखरांची एकमेकां साद
चन्द्रिकेंत मंद्र सागराचा नाद
कडाडून वीज कापते अंधारा
गूज धरतीशीं करी वर्षाधारा

कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

निसर्गाचे नवे अनुष्टुभ् छंद
केवळ सौन्दर्य केवळ आनंद

निशिगंधावर सुगन्धाचे पेले
प्राजक्त झेलतो चमेलीचे झेले
नागांनाही मोही असा सोनचांफा
ओलेत्या पृथ्वीच्या नव्हाळीच्या वाफा
तान्ह्या मस्तकाचा मस्त ताजा गंध
आंबेवनामधें वसंत ये धुंद

कशाचा बोध ?
तात्पर्य शोध ?

बांधून टाकिती सौरभबंध
केवळ सौन्दर्य केवळ आनंद

तप्त भाळावर माऊलीचा हात
ग्रीष्मांतील रात्रीं मन्दमन्द वात
ओल्या पुलिनाच्या पावलांशीं गोष्टी
षोडषवर्षेचे ओष्ठ निज ओष्ठीं

थंडीनें फुटल्या कपोलांचा स्पर्श
निर्भरालिंगनीं अनिर्बन्ध हर्ष
कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

पुरे नाहीं का हा हर्ष अनिर्बंध
केवळ सौन्दर्य केवळ आनंद

गोड तुरट तें शहाळ्यांचें जळ
गोड कडवट मद्य रतिफळ
गोड आंबटशा चिंचेची ती मिठी
ताज्या जांभळाची चव खट्टीमिठी
गोडी अवीट ती दीर्घ चुंबनाची
किंवा ओझरत्या बालकपोलांची
कशाचा बोध ?
तात्पर्य शोध ?

लुटा रे लुटा हा मधुमकरन्द
केवळ सौंदर्य केवळ आनंद

पांच नद्यांतून मनःसागरांत
आनंदजळाचे पूर भरतात
पंचरंगांच्या या इंद्रधनुष्यांत
चित्तचंडोल हो भरारी घेतात
पांच राजहंस माझ्या पालखीला
उचलती उंच आनंदमयांत

कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

जय शब्द स्पर्श रस रूप गन्ध
केवळ सौंदर्य केवळ आनंद

## नकळत तुमचे डोळे वळले

नकळत तुमचे डोळे वळले जिच्याकडे रस्त्यांत
हाय तिचा मीं बळी घेतला अवखळ तारुण्यांत
तिच्या स्मिताची ज्योत्स्ना अजुनी आहे तैशी आहे
भृकुटीखालीं व्याधद्वय तर अधिकच चमकत राहे
अजून अपुलें अंतर जाई गुंतुन कुन्तलपाशीं
ती मदिरा–ती जादू–विष तें अजुन मोहनेपाशीं
वरवरची ही ऐट तिची—हें सोंग नाटकी पुरतें
अजुन मला ती स्मरते स्मरते...अजून झुरते झुरते !

सोळा सतरा वसंत झाले तिच्या वयाला जेव्हां
वैभव अभिनव असें फुले कीं वसंत करितो हेवा !
निळ्या निळ्या वसनांचीं अभ्रें अंगावरति असून
तारुण्याची तिच्या झळाळी उसळे बंड करून
पदन्यास अन्यास कधींही तिचा न साधायाचा
यौवनमत्त असूनहि हल्लक झुलता फुलता साचा
अशा पदक्षेपांत एकदां हृदय गवसलें माझें
आणि तिच्या संमतिचें त्यावर आरुण तेज विराजे

येरझार नेत्रांची नंतर कितीकदां तरि झाली
कितीक संभाषणें निरर्थक, उगाच हंसुनी गालीं
शोधुन शोधुन कितीक कामें परस्परांचीं केलीं
आणि आर्त चित्तांत भावना अनभिज्ञात उदेली
आणि एकदां—नदीकिनारीं, जंव अंवसेची रात
दिव्य पौर्णिमा झळकुन गेली अमुच्या आयुष्यांत
तारुण्याची ज्योत मिळाली तारुण्यज्योतींत
मूकपणानें गाउन गेलों अद्‌भुत जीवनगीत

सगेसोयरे सांगति तेव्हां व्यवहाराची रीत
कोणि म्हणाले 'परत मागुती ! प्रीत असे विपरीत...
तूं तर नुकते पंख पसरले गगनें व्यापायाला
सोनेरी बेडींत उगा कां गुंतविसी पायाला
प्रज्ञा तव, तव विद्या, ध्येयें, आकांक्षाहि विशाल......
ही नटवी सटवी तुज भुलवी—झुगार तिजसि खुशाल'
आणि अखेरिस फसलों मी अन् मुकलों या बिजलीला
विद्याधन मी संचित केलें, विकलें धन मिळण्याला !

आज एक अश्राप मुलीचा पति मी संसारांत
गोजिरवाणीं दोन पांखरें खेळतिही दारांत
कुणाकुणाला जाणिव नाहीं—नसो कधीं जाणीव
कीं या भरल्या संसारीं मज वाटे अजुनि उणीव
मनामधें मी करपुनि गेलों—झाले केश रुपेरी
सळसळत्या नव तारुण्याची गेली आज उभारी
मी चुकलों, मी मुकलों तिजला; थकलोंही मी पुरता
भरल्या संसारांत स्मृति ती छळते मजला आतां !

वसंत बापट

तिची मान अभिमानभरानें अजून उन्नत राहे
तिच्या स्मिताची ज्योत्स्ना अजुनी आहे तैशी आहे
अजून अपुलें अंतर जाई गुंतुन कुंतलपाशीं
ती मदिरा–ती जादू–विष तें अजुन मोहनेपाशीं
सुखसंसारीं रडतों मी, ती हंसते शून्यमहालीं
अजुनि मुक्त उन्मत्तपणें ती छळते सांजसकाळीं
नकळत तुमचे डोळे वळती तिच्याकडे रस्त्यांत
आणि रोज मी बळी जातसे माझ्या प्रौढ वयांत !

## झेलमचे अश्रू

सुंदर किति गिरिकन्दर हिमराजाचे
सृष्टिसतीच्या घरचे कलश रुप्याचे
भरलें त्यांतुन निर्मळ शीतळ पाणी
दंवबिन्दू हे संचित नन्दनवनिंचे

माया रविची येतां कधिं सौवर्ण
हिमालयाचा होई दिव्य सुपर्ण
विशाल अपुल्या पंखांच्या छायेंत
रक्षित जणुं तो अमृतघटां परिपूर्ण !

उदार झाले परी एकदां देव
कृपणाऐशी नको म्हणाले ठेव
सुधा मिळूं दे अपुल्या सत्पुत्रांना
हृदयामध्यें उदया ये हा भाव

आणि म्हणाले पाहुनि अंवतीभंवती,
"तिलोत्तमे! ये; येइं मेनके! पुढती
चला उर्वशी, अलंबुषे! चल रम्भे!
अमृतकुंभ हे घ्या कटिखांद्यांवरती

फुलवाया नवजीवन धरणीवरती
उभवाया नववैभवशाली धरती
जगवायाला जगांत मानवजाती
जा उधळा ही दौलत तुमच्या हातीं

रूपें नामें दुसरीं आतां घ्यावीं
सिंधू—सतलज—चिनाब—झेलम—रावी!
देवांना प्रिय भारतभूचे पुत्र
संजीवनि ही सदा तयांना द्यावी!"

देवेन्द्राची आज्ञा वन्द्य तयांना
लगबग उठुनी झाल्या सज्ज प्रयाणा
'मानस-सर' हा विशाल दर्पण त्यांचा
त्यांत पाहती त्या वेळावुनि माना!

अशा निघाल्या ठुमकत मुरकत नारी
हिमालयाची कायम थिजली स्वारी!
अवघ्या अवखळ खळखळ खेळत जातां
हंसती कंदर, खुदखुदतात कपारी

मार्गामध्यें माळति सुमनें कोणी
नादामध्यें गुणगुणती वा गाणीं

होत्या सिंधू—चिनाब—सतलज—रावी;
झेलम भासे परि सर्वांची राणी !

मार्गामध्यें दुर्गम दुर्गमहर्षी
सहर्ष त्यांना खुशाल झेलम स्पर्शी !
स्वभाव कैसा जाइल मूळ तियेचा
विश्वामित्रा पूर्वी ती आकर्षी !

चालावें किति झेलमनें डौलांत
नाचावें किति लहरींच्या तालांत
तिनें हंसावें कमळांच्या नयनांनीं
अन् बोलावें पक्ष्यांच्या बोलांत !

अपुल्या गंधें कस्तुरिमृग हो धुंद
वेडावुनि तो फिरतो गरगर अंध !
बाहुंत त्याला झेलम झेलुनि घेई
आवर्तांतुन भरतो कस्तुरिगंध !

सर्वच असुनी हिमवंताच्या पोरी
झेलम होती त्यांतहि निस्तुल गोरी
नटण्याची परि पुरवायातें हौस
काश्मिरदेशीं केली केशर-चोरी ! !

कधीं प्रपातांतुनि झोंकुनि दे अंग
कडे दुतर्फा करी उभे उत्तुंग
कधीं कधीं ती मुग्धेपरि हो स्तब्ध
तारुण्याचे कधीं करावे रंग !

श्रीनगराची श्री झेलमवर लुब्ध
जहांगिराची गिरा जहाली मुग्ध
आणि म्हणाला अकबर, 'या झेलमच्या
वक्षावरि बरि कबर मला विश्रब्ध !'

न तो हिमालय—गोकुळ तें दुसरें हो !
घटाघटांतुनि दुग्ध जयांत भरे हो !
न त्या नद्या—त्या गौळणि हरिच्या साऱ्या
मधेंच झेलम राधेपरि विचरे हो !

आली देखा, झेलम गौळण आली
कटि-खांद्यावर घट होती वर खालीं
निळसर शालू सोनसळी कांठांचा
लेउनि आली गौळण ही मतवाली

जाइल तिकडे तृषार्त झाले शांत
आणि भुकेले थांबविती आकांत
शिंपित शिंपित संजीवन जातां ही
'शान्तिस्तुष्टिः पुष्टिः' पंजाबांत

ती ही झेलम—पंजाबाची राणी
ती ही झेलम—सौंदर्याची खाणी
कामदुहा ती दूती देवेन्द्राची
दिसते देखा आतां केविलवाणी

युगानुयुग ही होती तैशी होती
ऋग्वेदांतिल हिनें ऐकल्या गीती

धम्मपदांतिल वचनें येती पाठ !
अशोक होता दावित इजवर प्रीति

उतरे तीरीं शिकंदराची सेना
हिनें पाहिली शकहूणांची दैना
हिच्या घटांतिल दुग्ध पिऊनी मात्र
संस्कृति लाभे अवघ्या संस्कृतिहीनां !

या झेलमचें एकच शाश्वत गीत
"करा करा रे परस्परांवर प्रीत
धर्मांच्या वा वंशांच्या अभिमानें
झगडायाची रीत किती विपरीत !

शीख असूं दे, असुं दे मुस्लिम-हिंदू
एकच आहे मानव्याचा सिंधू !
...या सिंधूस्तव आहे जीवन माझें
एकवटा रे ! जैसे बिन्दुंत बिन्दू !"

आणि खरोखर झेलमच्या हृदयाला
भिन्नत्वाचा स्पर्शहि नाहीं झाला
कुणी असूं दे भारतभूचा पुत्र
देवेन्द्राची आज्ञा वन्द्य तियेला

कुणी असावी दोन जुळ्यांची आई
दोघांनाही दूध पिण्याची घाई...
माउलिच्या मग मायेनें दोघांना
घेउनि अंकीं स्तन्य जशी ती देई

तैशी देखा—आली झेलम आली
कटि-खांद्यावर घट होती वर खालीं
हिन्दकळोनी दूध अहा! ओसंडे
दो तीरांवर पुष्टिस्तुष्टी झाली!

ती ही झेलम—औदार्यांची मूर्ती
ती ही झेलम—ऋग्वेदाची स्फूर्ती
दिसते देखा आतां केविल्वाणी
कामदुहा ती देवेन्द्राची दूती

किती लढाया झाल्या हो तिजपुढती
चेंगिझ-नादिर अनेक येती जाती
आज मला परि दिसते झेलम जैशी
उदास, तैशी कधींच दिसली नव्हती

तीरांवरती सैन्यें लढलीं, मेलीं
परस्परांची हानी भलती झाली!
शांत अशा परि साध्या नागरिकांची
अशीं न फिरलीं माथीं कुठल्या कालीं

आज! अरेरे! झेलम हो शरमिंदी
तिच्या तरंगीं रक्त मिळे जास्वंदी!
या झेलमच्या स्तन्यावर जे पुष्ट
त्या पुत्रांतच व्हावी अंदाधुंदी!!

थंडपणानें भाऊ मारिति भावां
दोस्ती दावुनि साधुनि घेती दावा

अन् आईच्या उघड्या डोळ्यांपुढतीं
त्या पुत्रानें याचा प्राणच घ्यावा !

जिला असावें काल्च म्हटलें ‘ बेटी ’
तिला धरावें खुशाल भरल्या हाटीं !
आणि अखेरिस झाल्यावर निर्माल्य
तिनें भरावी या झेलमची ओटी !

शेजाऱ्यांचीं पेटवुनी घरदारें
चिमणीं बाळें फेकिति आंत अरेरे !
झेलुनि त्यांच्या अस्फुटशा किंकाळ्या
झेलमजवळी येउनि रडती वारे

त्या वाऱ्यांची ऐकुनि करुण कहाणी
कोमेजुनि ती गेली झेलम राणी
आणि म्हणाली, पाहुनि पशुता यांची
मम हृदयाचें झालें पाणी पाणी !

पुष्कळ पूर्वी पाहियला संहार
युद्धामधुनी कोटी सैनिक ठार !
अक्षौहिणी त्या मेल्या कौरवसेना
वेड परी हें सर्वांहुनि अनिवार !

सिंहव्याघ्रां मानव म्हणतो हिंस्र
अजगर म्हणती असतो फार अजस्र
वेडा मानव या सर्वांहुनि दुष्ट
मारुनि टाकी बांधव कैक सहस्र !

व्यर्थचि गेली उपनिषदांची वाणी ?
मानव शिकला नाहीं कांहिं कुराणीं ?
व्यर्थ तयाच्या पुढती ठरली गीता !
बुद्ध नि येशू सर्वांवरती पाणी !

कशी अचानक गेली यांची शुद्ध ?
पाजियली मी मदिरा किंवा दुग्ध ?
कालच होते भासत देवांऐसे
आज तयांचे बनले राक्षस शुद्ध !"

खूपच केला मग झेलमनें शोक
नको म्हणाली मजला मानवलोक
परतुनि गेली झेलम हिमवंतात
आणि म्हणाली एकच तेथें श्लोक—

"सर्वज्ञ न हे देव—असे तो दंभ
मनुजापुढती ठरले केवळ शुंभ
देवापेक्षां मानव आहे थोर
अमृतघटांचे क्षणिं करितो विषकुंभ"

## जायचेंच ना

जायचेंच ना ? लवकर जा तर
रेंगाळत मधुरजनीपरि तूं करूं नको ग अंतर कातर

फिरून येशिल जेव्हां इकडे
विसरुन ये तव घड्याळ इवलें, विसरुन ये मिनिटांचा पंजर

विसर सफाई प्रसाधनाची
इस्त्रीची अन् टापटिपीची विसरुन ये तव नीती नागर

विसरुन ये वेणींतिल गजरा
विसर मुलायम रेशिम झालर, विसर तुझे किणकिणते बिल्वर

विसर सये गतिवाचक भाषा
विसर विसर तीं काल्वाचकें--जलद, भराभर, झरझर, लवकर

विसर सांज अन् दिवेलागणी
ध्रुवावरिल रात्रीपरि येई गूढ मनोहर घालित पांखर

प्रशांतसागरलहरीपरि तूं
कंपित आतुर अंतर झांकित संथगतीनें ये मदमंथर

## सेतु

शरदामधली पहाट आली तरणी ताठी
हिरवे हिरवे चुडे चमकती दोन्ही हातीं
शिरिं मोत्यांचें कणिस तरारुन झुलतें आहे
खांद्यावरतीं शुभ्र कबूतर खुलतें आहे

नुकतें झालें स्नान हिचें तें राजविलासी
आठ दिशांच्या न्हाऊं घालित होत्या दासी

निरखित अपुली आपण कांती आरस्पानी
थबकुन उठली चाहुल भलती येतां कानीं

उठली तों हिज जाणवलें कीं विवस्त्र आपण
घे सोनेरी वस्त्र ओढुनी कर उंचावुन
हात दुमडुनी सांवरतां तें वक्षापाशीं
उभी राहिली क्षण ओठंगुन नीलाकाशीं

लाल ओलसर पाउल उचलुन अशी निघाली
वारा नखरे करीत भंवती रुंजी घाली
निळ्या तलावाघरचें दाल्न उघडें आहे
अनिश्चयानें ही क्षितिजाशीं उभीच राहे

माथ्यावरती निळी ओढणी तल्म मुलायम
गालावरती फुलचुखिनें व्रण केला कायम
पायाखालीं येइल तें तें खुलतें आहे
आभाळाची कळी उगीच उमलते आहे

झेंडू गेंदेबाज गळ्याशीं बिलगुन बसले
शेवंतीचें स्वप्न सुनहरी आजच हसलें
निर्गंधांचे रंग पाहुनी गहिरे असले
गुलाब रुसले, ईर्ष्येनें फिरुनी मुसमुसले

फुलाफुलांची हनु कुरवाळित अल्लड चाले
तृणातृणांशीं ममतेनें ही अस्फुट बोले
वात्सल्य न हें—हेही यौवनविभ्रम सारे
सराइताला समजावे हे मुग्ध इशारे

दिसली ही अन् विस्फारित मम झाले नेत्र
स्पर्शानें या पुलकित झालें गात्र नि गात्र
ही शरदांतील पहाट...कीं...ती तेव्हांची तूं ?
तुझिया माझ्यामधें पहाटच झाली सेतू !

## फुंकर

बसा म्हणालीस, मी बसलों
हसलीस म्हणून हसलों
बस्—इतकेंच...
बाकी मन नव्हतें थाऱ्यावर

दारावरचा पडदा दपटीत
तूं लगबग निघून गेलीस
माजघरांत
माझ्या सोबत ठेवून
तुझ्या सुस्त संसाराच्या निशाण्या ..

या जाळीच्या पडद्यांत
कशाला कोरलें आहेस
हें हृदय, उलटें, उत्तान ?...
कांचेच्या कपाटांत
कशाला ठेवल्या आहेस
भुस्स्याच्या राघूमैना ?...
उडताहेत लाकडी फळांवर

कचकड्याचीं फुलपांखरें
भिंतीवर रविवर्म्याचीं पौष्टिक चित्रें हारीनें.

काळ्या मखमलीवर
पतीच्या नांवाचा रेखीव कशिदा—
त्यांला एक टांका जरी चुकली असतीस
तरी मी धन्य झालों असतों.

तूं विचारलेंस, काय घेणार ?
काय पण साधा प्रश्न—
काय घेणार !
देणार आहेस का तें सारें—पूर्वीचें ?
मला हवे आहेत
चिंचेचे आंकडे—ते
ते अधाशी ओठ, ती कुजबुज, त्या शपथा !
दे झालं कसलंहि साखरपाणी.

तुझें आणि तुझ्या पतीचें हें छायाचित्र
छान आहे.
तुझ्यावरची सारी साय
या फुगीर गालांवर ओसंडते आहे.
बळकट बाहू, रुंद खांदे
डोळ्यांत कर्तेपणाची चमक
छान आहे.
राग येतो तो तुझा
या चित्रांत तूं अशी दिसतेस

अशी दिसतेस कीं
जसें कांहीं कधीं झालेंच नाहीं !

मी तुला बोलणार होतों
छद्मीपणानें
निदान एक वाक्य, एक जहरी बाण, निदान एक
तें मला जमलें नाहीं, आणि
तूं तर नुसती हसत होतीस
आतां एकच सांग
उंबऱ्यावर तुझ्या डोळ्यांत पाणी आलें—
इतकी का तुला सुपारी लागली ?
पण नकोच सांगूस
तेवढीच माझ्या मनावर
एक फुंकर !

## विस्मृति

छे गऽ...आतां कशी रहावी
स्मृती मला तेव्हांची सगळी ?
होता का ग चंद्र तेधवां,
कीं होती ती रात्र वादळी ?

भिजल्या रानावरून तेव्हां
आला होता मातट गंध ?
कीं घमघमला होता तेव्हां
तुझा मोकळा कुंतलबंध ?

चंद्रकळा होतीस नेसली...
चुकलों ना ? छी...कसा विसरलों...
जास्वंदीची चुनडी ? नाहीं ?
तूंच सांग...मी पुरता हरलों.

मात्र एवढें स्मरतें आहे...
होता त्याचा पोत रेशमी !
कां डोळे करितेस एवढे ?
चुकलों का गऽ सांग पुन्हा मी ?

कानांमधलीं तुझीं कुंडलें
सल त्यांचीं माझ्या गालावर...
मलाच उलटें म्हणालीस तूं
असा कसा होतोस अनावर !

म्हणालीस का—
कीं हे सारे
माझ्या मनचे उनाड चाळे ?
सांग काय कुजबुजलों आपण ?
विसरलीस का तूंही सगळें ?

होतिस ना तूं फुलें माळलीं ?
नाहीं ? आठव नीट जराशी...
मला वाटतें बकुळफुलांचा
गजरा होता तुझियापाशीं...

साधी होतिस तरी त्या दिशीं
लाविलेंस वाळ्याचें अत्तर

नाहीं ? मग हा संभ्रम माझा
तुझाच किंवा ? मीच निरुत्तर

एक मात्र आठवतें निश्चित
पहाट झाली होती लौकर
भिजलें होतें भाळ दंवानें
कांटा फुलला अंगांगावर

माझा कोट तुझ्या खांद्यावर
शाल तुझी अन् माझ्या देहीं
चुकलों का मी पुन्हा ? सांग मग
कशी भासली थंडी नाहीं ?

## आज अचानक

नव्हती लिहिली तुजवर कविता
आजहि नसती लिहिली
नव्हतों कधिं लिहिणार, परंतु
आज अचानक—

अंध डोळ्यांनीं पहावें तरी काय तुझ्यांत ?
न तुझी चाल चंचल
न अवखळ अंचल
न तीळ कुठें गालावर
न कुरळें बंड भालावर

नाहीं गोड खळी
न नाक चाफेकळी
न रंग, न ढंग
न छडीदार अंग
स्वरांत कोयल नाहीं
उरांत ऊर्मी नाहीं
न डोळ्यांत जहर
न अंगांत बहर
लिहीन म्हटलें कांहींबाही
तर तसें कांहींच नाहीं
म्हणूनच
नव्हती लिहिली तुजवर कविता
आजहि नसती लिहिली
नव्हतों कधिं लिहिणार, परंतु
आज अचानक—

रोज रोज पहात होतों
शेजीबाईच्या अंगणामधलीं
प्राजक्ताचीं झाडें
आज माझ्या दारीं त्यांचे सडे जसे पडले आहेत
इंद्राऐसे माझ्या अंगा हजार डोळे फुटले आहेत
दिसतें आहे लपलें धन
कळतें आहे दुखरें मन
आज अगदीं अचानक छंद माझा मुक्त झाला
आणि तुझ्या व्यक्तित्वाचा घोट घेऊन तृप्त झाला !

# बाभुळझाड

अस्सल लाकूड, भक्कम गांठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात गारा खात बाभुळझाड उभेंच आहे

देहा फुटले बारा फांटे
अंगावरचे पिकले कांटे
आभाळांत खुपसून बोटें बाभुळझाड उभेंच आहे

अंगावरची लवलव मिटली
माथ्यावरची हळद विटली
छाताडाची ढलपी फुटली बाभुळझाड उभेंच आहे

जगलें आहे, जगतें आहे
काकुळतीनें बघतें आहे
खांद्यावरती सुताराचें घरटें घेऊन उभेंच आहे

टक्...टक्...टक्...टक्
चिटर फटक्...चिटर फटक्
सुतारपक्षी म्हाताऱ्याला सोलत आहे, शोषत आहे

आठवतें तें भलतें आहे
उरांत माझ्या सलतें आहे
आंत कांहीं कळतें आहे, आंत फार जळतें आहे

अस्सल लाकूड भक्कम गांठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात गारा खात बाभुळझाड उभेंच आहे

## एक डोळा आणि एक डोळा

एक डोळा काळा सोवळा, रुखासूखा वखवखलेला
निळ्या काळ्या, नव्या कोऱ्या ब्यूकमागून धावत आहे;
तिकतिकणाऱ्या सडकेवरून
टेकाडावर सरपटत,
सुसाटत, पिसाटत
लाल पिवळ्या, जून कवळ्या
बागेवरती तुटून पडून
फिक्कट हिरव्या बंगलीवरतीं
घोंगावत फिरतो आहे;

मल्मलीचें पोट चिरून,
मखमलीवर पाय ठेवून
चोरून आंत शिरतो आहे;
सोनपितळी कुंडीमध्यें
फताडपंख्या पामखालीं तणावून निजतो आहे;

किणकिणणारीं कांचपात्रें
लचकणारीं चारुगात्रें
यांच्या मधांत भिजतो आहे;
कोचाखालीं गालिच्यावर
कुलंग्याचें रूप घेऊन
तुष्ट तोंड, सुस्त देह, पुष्ट मांडी बघतो आहे;

जव्हेऱ्यांच्या बाजारांत
गिरक्या घेत उडतो आहे;

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

विमानांत चढतो आहे
गॉगलवाला एक डोळा . . .

एक डोळा साधाभोळा, नंगा पिंगा, बिथरलेला
भराभर भरून येतो,
झराझर झरून जातो,
घामेजलेल्या कोमेजलेल्या
ठार मेल्या फुलांवरती धार त्याची झिरपत आहे
त्यांच्या संगें करपत आहे
नको तेथें शिरतो आहे,
भलतें सलतें बघतो आहे,
खप्पड कुठलें खोपट बघून कौलारांत घुसतो आहे;
खडखडणाऱ्या पातेल्यांतील कळकट पळींत बसतो आहे;

चौकस तिरकस वेध घेऊन
मातटलेल्या लक्तरांचा सुईदोरा बनतो आहे
गटारांत खेटर होऊन भिजतो आहे;
कोळपलेल्या निर्माल्यांत निजतो आहे;
वडाराच्या मडक्यामध्यें शिजतो आहे;
फाटून गेल्या पदरामागील
आटून गेल्या मायेवरतीं मऊ शाल होतो आहे;
वाळून गेल्या
कोळून गेल्या
इवल्या अर्ध्या पोरांओठीं दूध पिळत गळतो आहे;
जळतो आहे...जळतो आहे
लाल...पिंगा...ओलाचिंब...

नंगा नंगा...बिथरलेला...
हपापलेला एक डोळा दिपतो आहे
चपापलेला एक डोळा टिपतो आहे...

## केवळ माझा सह्यकडा

भव्य हिमालय तुमचाअमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजिन रायगडा
तुमच्या अमुच्या गंगा यमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हांला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते तुकयाचा आधार मला

धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती

या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यांतुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा

कबीर माझा, तुळसी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला परि माझा नाम्याचा नाच
जनीं जनार्दन बघणारा तो 'एका' हृदयीं एकवटे
जनाबाइच्या ओवीमध्यें माझी मजला खूण पटे
इंद्रायणिच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐशी जवळिक कायमची झाली

भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे
निर्गुण मानवतेची पूजा करणारे करुं देत भले
माझ्यासाठीं भीमाकांठीं भावभक्तिची पेठ खुले

रामायण तर तुमचेंमाझें भारत भारतवर्षाचें
छत्रपतीची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचें
रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरि मजला रुचते
हृदयाच्या हृदयांत परंतू बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचा शेवटचा तो शब्द अजुन हृदयामाजीं
बच जायें तो और लढें
पाउल राहिल सदा पुढे
तुम्हांस तुमचे रुसवे फुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठीं राहिल गांठीं मरहट्ट्याचा हट्ट खरा

तुमचे माझे ख्यालतराणे दोघेही ऐकूं गझला
होनाजीची सोनलावणी वेड लावते परि मजला
मृदंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन् मुरली
थाप डफाची कडकडतां परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडां तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद
भिंवईवर चढते धुंद
औट हात देहांत अचानक वादळ घुसमडुनी जातें
उचंबळे हृदयांत पुन्हा तें इतिहासाशीं दृढ नातें

कळे मला काळाचें पाउल द्रुतवेगानें पुढति पडे
कळे मला क्षितिजाचें वर्तुळ क्षणोक्षणीं अधिकचि उघडे
दहा दिशांचे तट कोसळले ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वातें कवळी
माझ्या घरचीं विशाल दारें, खुशाल हीं राहोत खुलीं
मज गरिबाची कांबळ वाकळ सकळांसाठीं आंथरली

मात्र भावड्या हृदयांत
तेवत आहे जी ज्योत

ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुन झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथें कोट उभारूं निमिषांत

## रंगानें तूं गव्हाळ

रंगानें तूं गव्हाळ त्यांतुन अंगावरती सोनसळा
टवटवीत घवघवीत मुखडा चांफ्याचा जणुं सोनकळा

कुरळ्या कळपामधून चुकला भाळावरि कुणि वाट खुळा
मधाळ ओठीं सुढाळ मोतीं मध्येंच करती झळाझळा

कानशिलाचें पान कोवळें सान त्यावरी तीळ निळा
तिरप्या नजरेमधुन घातला कसा काळजावरी विळा

उभार बांध्यामधुन उमटला जरा उभट हा गोड गळा
तुझ्या भुजांवर रुतून बसला गच्च कानडी खण पिवळा

ठाय पावलें घाय घालती केळफुलांची त्यांस कळा
तुझ्या गतींतुन निर्झरणीचा खळाळ फुटतो खळाखळा

निघतां निघतां हसून बघतां असा लावला कसा ळळा
अलावला अलवार जिवाची तुझी मला अन् माझि तुला

उजाड माझ्या वैराणावर कोसळला ग पाणकळा
सुकला होता माळ त्यावरी पिकला माझा पानमळा !

## नाजुक रुपडें

नाजुक रुपडें टाकटिकीचें संभावित टाकमटिकली
किती पाहिली तरी निवेना नजर आमुची वखवखली

चोळीवरती सोळा ऐने, आटांना दुनिया दिसली
नजर जराशी घुटमळली तों पदर चोंबडा करि चुगली !

ओठटिपीचा रुमाल इवला घडी तयाची धुसमटली
हळहळ वाटुनि हृदय म्हणालें हाय तुझी जागा चुकली !

झुलणारी शेलाटी कंबर पीतांबर बळकट कसली
तकतकतां केतकी पोटऱ्या वीज नसांमधुनी घुसली

झणत्कारतां तुझीं पावलें कानांना पानें फुटलीं
तुला पाहतां एक पापणी शिणली अन् अलगद मिटली

सन अठराशेंमधी पुण्याला भेट जर का असती घडली
घडगत नव्हती तुझी साजणी ! हुकली ग ऽ संधी हुकली ! !

# मंगेश पाडगांवकर

- जिप्सी
- हात हवे मज
- जय जय हे पार्थिवते
- दर्शन
- अलगूज
- जवळपणाचें झालें बंधन
- अहो जग पुढें गेलें
- पळवाट
- मज नव्हतें ठाउक
- कसें काय अन् कोठें चुकलें
- बरेच दिवस
- छोरी
- सुरंगा
- आहे त्याहुन
- उत्तर
- विसरायाचें म्हणशील जितुकें
- वज्रपुरुष
- मंगेश पाडगांवकर : एक दृष्टिकोन

## वात्रटिका :

गायनीकळा

पंडित

बंब

खर्जेखाँ

जागृति

नऊ चुका



मंगेश पाडगांवकर

## जिप्सी

एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

आठवतें बालपण जेव्हां होतों मी खेळत
होतों बांधीत मी घर सवंगडयांच्या संगत
कौलें पानांचीं घराला आणि झावळ्यांच्या भिंती
आठवतें अजूनहि होतों रंगत मी किती !

पण अकस्मात होतों जात सारें उधळून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

शाळेंतले ते दिवस पाटी-पुस्तक हातांत
टोपी जरीची सुंदर...स्वारी निघाली थाटांत
जाड काचेची चाळिशी लावूनिया डोळ्यांवर
होते बोलत पंतोजी उग्र रोखून नजर
पण ठरेचना मन चार भिंतींच्या जगांत
उडे खिडकीमधून दूरदूरच्या ढगांत
झाडें पानांच्या हातांनीं होतीं मला बोलावीत
शेपटीच्या झुबक्यानें खार होती खुणावीत

कसें आवरावें मन ! गेलों पळून तिथून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

आणि पुढें कशासाठीं गेलों घर मी सोडून !
सारीं सारीं सुखें होतीं, कांहीं नव्हतेंच न्यून

पण खोल खोल मनीं कुणी तरी होतें दुःखी
अशा सुखांत असून जिप्सी उरला असुखी
दिसूं लागले डोंगर जरा मिटतां लोचन
तिथें कुणी तरी मला नेऊं लागलें ओढून
मिटलेल्या डोळ्यांपुढें खळखळणाऱ्या लाटा...
सळसळणारीं पानें...दूर पळणाऱ्या वाटा
वाटांसवें त्या पळालों सारें कांहीं झुगारून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

कधीं कधीं पहाटते उरीं आगळी प्रतीती
जाळीमधून धुक्याच्या तेज झिरपतें चित्तीं
जाचूं लागते जिप्सीला ज्ञात विश्वाची चौकट
आणि जाणवतें कांहीं गूढ...अंधुक...पुसट !
खेळ मांडिलेला सारा पुन्हा उधळाया सजे
आपणच निर्मिलेलें आपणच मोडूं धजे
गूढ अज्ञात धुक्यांत आणि जातसे बुडून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

घर असूनहि आतां घर उरलेलें नाहीं
चार भिंतींची जिप्सीला ओढ राहिलेली नाहीं
कुणीं सांगावें ? असेल पूर्वजन्मींचा हा शाप
घडी सुस्थिरपणाची विसकटे आपोआप...
कुणी तरी साद घाली दूर अनंतामधून...
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

# हात हवे मज

हात हवे मज नाजुक सुंदर
जुइपुष्पांपरि ज्यांचें मार्दव
श्रावणांतल्या उन्हापरी अन् ज्यांचें लाघव !
स्पर्श जयांचा स्पर्शमण्यापरि
अवखळ चंचल जे लाटांपरि
दडलें ज्यांतुन
प्रमत्त यौवन
पुनवेच्या उत्फुल्ल रात्रिचें रजत निमंत्रण

हात हवे मज नितांत वत्सल
क्षमाशील जे क्षमेहुनीही
पुण्यशील जे गंगेहुनिही
जे मायेचा घास भरविती चिमण्या ओठीं
जे चुकलेल्या पांथस्थांना दीपच होती !
हात अन्नपूर्णेचे असले !
साफल्याचें अन् तृतीचें
ब्रीद जयाचें या धरणीपरि
सदैव ज्यांची वत्सल पाखर आकाशापरि !

हात हवे मज तसले कणखर
कर्मयोग साकार ज्यांमधें
जे मातीमधिं बीज पेरिती
धगधगणाऱ्या उन्हांतही जे
नांगर धरिती, औत फिरविती !

खपती, श्रमती
जे यंत्रांवर, जे घाण्यांवर,
हातोड्यांवर, अन् मोटेवर
अन् जे घाणीच्या पाट्यांवर;
दिव्य उद्यांच्या मानवतेचे शिल्पकार जे !

हात हवे मज तसले अद्भुत
सृजनशील जे दिव्य कलाधर !
जे ब्रह्मयाशीं स्पर्धा करिती !
चितारिती जे
इंद्रधनूचें स्वप्न मुलायम !
छेडितात जे
पार्थिवतेंतुन गीत अपार्थिव !
स्पर्शें ज्यांच्या
शब्दांमधुनी
निःशब्दाचें गुपित उलगडे !
किमया ज्यांची
क्षुद्र असुंदर पाषाणांतुन
निराकार चिरसौंदर्याची घडवी मूर्ती !

हात हवे मज
ख्रिस्तापरि ते पवित्र तसले !
वर्षेहुनि जे दयार्द्र असुनी,
कडाडणारा करांत आसुड घेउनि येती
क्रुद्ध विजेपरि आणि उगारिति
त्यांच्यावरतीं, केला ज्यांनीं
बाजारच मंदीर प्रभूचें;

विकिती जे बांधून खगांना,
मुक्त उडावें नभांत ज्यांनीं !
विकिले ज्यांनीं अपुले आत्मे
क्षुद्र आपुल्या स्वार्थासाठीं !
हात हवे मज
असे शुभंकर अन् प्रलयंकर
शांतिरूप जे
ज्यांत जळे परि विराट संगर !

हात हवे मज तसले मंगल :
मध्यरात्रिच्या प्रशांत प्रहरीं
जग सारें निद्रित असतांना,
असतांना नभ नक्षत्रांकित
गिरि पद्मासनिं ध्यानावस्थित
चराचराचें मैत्र दाटुनी
सहजच जे प्रार्थनेंत जुळती
सहजच जे प्रार्थनेंत स्फुरती !
जे चिरजागृत, जे करुणामय
जे मृत्युंजय, जे अमृतमय
आशीर्वादच मूर्तिमंत जे
उरले जे उपकारापुरते
हात हवे मज असले मंगल
पवित्र सुंदर !

## जय जय हे पार्थिवते

हे पार्थिवते,
त्या ब्रह्माची केली पूजा ज्यांनीं
तुच्छ लेखिलें त्यांनीं तुजला
जाणिव नव्हती त्यांना तुझिया अस्तित्वाची,
ब्रह्म सत्य अन् मिथ्या जग हें सारें—
हीच धारणा होती त्यांची;
ब्रह्म सत्य...!
अन् असत्य होती माती,
असत्य होतें कूस तिची भेदुनिया वर येणारें
लसलसणारें हिरवें पातें,
असत्य होते रंग गंध रस,
असत्य शोभा संध्येची, सौंदर्य उषेचें...
ब्रह्म सत्य अन् मिथ्या जग हें सारें!
हे पार्थिवते,
जाणिव नव्हती त्यांना तुझिया अस्तित्वाची!!

हे पार्थिवते,
ही सृष्टी होती गात सदोदित
यशगान तुझें, जयगान तुझें—
फुलाफुलांतुन, तृणातृणांतुन
मंथर आतुर जललहरींतुन
कधीं भव्य पाषाणांतुन अन्
कधि झुळझुळत्या हंसशुभ्र शुभ निर्झरणींतुन;
तुझी प्रतिष्ठा वज्रबलानें सम्राटापरि होती गर्जत

गिरसप्पाच्या उद्घोषांतुन !
तारुण्य तुझें, कारुण्य तुझें होतें वाहत
गंगेमधुनी, यमुनेमधुनी
करीत सुफलित कणकण या मातीचा !
आषाढाच्या धारांतुनि तूं बरसत होतिस,
गच्च वाढल्या पिकांतुनी तूं डोलत होतिस, बोलत होतिस,
तूं चुंबित होतिस धार विळ्याची,
आलिंगित होतिस नांगर अन् फिरणारा
हे पार्थिवते,
ही सृष्टी होती गात सदोदित
यशगान तुझें, जयगान तुझें !

हंत ! परंतू त्यांना दिसलें नाहीं
सत्य तुझ्यांतील जगवित जग जगणारें.
दिसलें त्यांना मिथ्या जग हें सारें :
ते शोधुं लागले ब्रह्म अपार्थिव
दुर्लक्षुनि ही माती
अव्हेरुनि ही माती.
आकाराला तुच्छ लेखिलें त्यांनीं,
तुच्छ लेखिलें त्यांनीं अवघें
रंगांचें जग, गंधांचें जग,
फुलणारें झुलणारें सुंदर पुष्पांचें जग,
शीळ वाजवित उडणाऱ्या त्या पक्ष्यांचें जग,
ऋचा भव्यतेची गाणाऱ्या शिखरांचें जग,
उर्वशीच्या चिरतारुण्यापरि—
अविरत झुळझुळणारें सुंदर सरितांचें जग.

हे चिरसुंदर पार्थिवते, तुज अव्हेरियलें त्यांनीं;
परित्यक्त मेनकेपरी तूं उभी राहिलिस
ऐश्वर्याचें सौंदर्याचें शाकुंतल घेउनिया हातीं,
हाय परंतु ! मिटून डोळे (आणि हृदयहि !)
अव्हेरियलें त्यांनीं 'मिथ्या जग' हें :
ते शोधुं लागले ब्रह्म अपार्थिव
दुर्लक्षुनि ही माती, अव्हेरुनि ही माती !

हे पार्थिवते !
केला त्यांनीं अव्हेर तुझा...
आणिक आलें दैन्यच अंतीं भाळीं :
षड्रस झाले रुष्ट...भूमि अश्रद्ध मनापरि वंध्या झाली
अज्ञातानें गिळिलें सोनें पृथ्वीच्या उदरींचें
लुप्त जाहलीं रत्नें आणिक नांवाचा उरला रत्नाकर
करिं नांगर धरणाऱ्यांच्या उरिं नुरली श्रद्धा
गंजुनि गेले फाळ, गंजले विळे-कोयते,
हंत ! तक्षकानें घर केलें उरीं फळांच्या—
ऐश्वर्याच्या परिक्षिताला दंशण्यास कडकडुनी.
हे पार्थिवते !
लुप्त जाहली ऐश्वर्याची प्रभा तुझ्या...
अन् गंजुनि प्राक्तन
उरलें केवळ विकल अंतरीं धुकेंच त्या ब्रह्माचें !
आसक्तीनें पोखरलेले प्राण...परंतु
अधरांवरतीं होतें ध्रुवपद :
"ब्रह्म सत्य अन् मिथ्या जग हें सारें !"
आणिक आतां रित्या मनांतुन,

रिक्त गाडग्यांतुन, मडक्यांतुन
ब्रह्म ? कोठलें ब्रह्म ? दुःख-दारिद्र्यच उरलें !

हे पार्थिवते !
कळलें आतां नाहिं तुझ्याविण ब्रह्म वेगळें
असतें का कधिं स्मित अधरांविण ?
गंध फुलांविण ? जल वर्षेविण ?
कळतें आतां ब्रह्म तुझ्यांतुन
बीजामधुनी वर येणाऱ्या वृक्षापरि नित विकसत असतें;
कळतें आतां—
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणूनच ब्रह्म सत्य,
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणुनि सौंदर्य सत्य,
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणूनच रंग-गंध-रस-रूप सत्य,
तूं आकारसत्य अन् निराकार व्यक्तित्व तुझें
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणूनच ब्रह्म सत्य !
जय जय हे पार्थिवते,
जय जय हे वृक्षांतिल, पक्ष्यांतिल पार्थिवते,
जय जय हे मातींतिल, मूर्तींतिल पार्थिवते,
जय जय हे अन्नांतिल, वस्त्रांतिल पार्थिवते,
जय जय हे रंग-गंध नादमयी, जय जय आकारमयी,
जय जय कारुण्यमयी, जय जय तारुण्यमयी;
ब्रह्म तुझ्या गर्भांतच वाढतसे
विकसतसे...विकसतसे...
जय जय हे पार्थिवते !
जय जय हे पार्थिवते !

# दर्शन

मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

होत्या लाटा उधळित अपुली फेनिल कविता
फुलांफुलांतुन अखंड उमलत होती नवता
होते वारे वाहत, तारे होते चमकत
बाभळिवरही गुच्छ फुलांचे होते लगडत
रे कसें वेगळें म्हणूं सांग तुज यांच्यापासुन ?
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

उठुनि पहाटे जावें तर तूं रंगच व्हावें
नभीं पहावें तर तूं ढग होऊन झुलावें
या धारांतुन तुझे कृपामय हात दिसावे
किरणांच्या अधरांवर स्मित तव फुलत असावें
हें डोळे भरुनी बघतों आहें सारें अनुदिन
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

तूं नाहिंस ? या वसंतांतुनी कोण फुले मग ?
तूं नाहिंस ? दवबिंदुंत कां मग झगमग झगमग ?
तुझ्यावांचुनी बीजांमधुनी कोण फुले रे ?
तुझ्यावांचुनी रंगांमधुनी कोण खुले रे ?
मीं कधिं न पाहिलें तुझें निराळेपण त्यांच्याविण
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

हेलवि जनसागर माझ्या अवतींभवतीं
खरें सांग, हीं नाना रूपें तुझींच नव्हतीं ?

मनामनांतुन त्यांच्या होती तुझी चेतना
कर्माकर्मांमधून होती तुझी प्रेरणा !
मीं कसें उणें तुज करूं त्यांचिया सुखःदुखांतुन ?
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

तुला पाहिलें ऋतूऋतूंतुन, फुलाफळांतुन
त्या गगनांतुन, या मातींतुन, स्थितीगतींतुन
संघर्षांतुन, सुखदुःखांतुन, व्यथेव्यथेंतुन
या सृष्टींतुन अन् भवतींच्या मानवतेंतुन
रे कसें शोधुं तुज वेडयापरि मी तुलाच टाकुन !
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

## अलगूज

ध्यानींमनिंही नसतां माझ्या
आज भेटलिस अशी अचानक
खरें सांगु का !
विसरुनिही मी गेलों होतों
धूसर झाली होती ओळख !

भेटतांच तूं परंतु केला
ओळखल्याचा तुला बहाणा
तुला परंतू कळलें सारें
हें कळलें मज तूं हसतांना

ग्रंथ संग्रहालय
१२८१५

"विसरलांत ना माझी ओळख ?
कशास मग ही फसवाफसवी ?
सांगा माझें नांव बरें मग
सांगा ना ! कां लपवाछपवी ?"

किती धीट तूं
क्षणभर लाजुनि बावरलों मी
शब्दहि अडले अधरांवरतीं
हारच ही माझी नव्हती का ?
घडली होती तुझी विस्मृती !

किती बोललों आपण नंतर
स्वच्छ मोकळें शुभ्र झऱ्यापरि
नसतां कारण उगीच हसलों
उगीच फुललों आणि फुलांपरि

जुन्या स्मृती क्षण नवीन झाल्या :
तें विद्यालय...गडबड...गोंधळ
त्या सहली...संमेलन...चर्चा
जग तें सारें जिवंत अवखळ

चालत होतों रस्त्यावरुनी
हासत खिदळत बोलत आपण
प्रौढपणाचें ओझें नव्हतें
नव्हतें उपचारांचें बंधन

रस्त्यावरतीं वाटहि नव्हती
गर्दीचें गजबजतें जीवन

त्यांच्या मध्यें असून आपण
निराळेच होतों त्यांच्याहुन

चिडुनि म्हणालिस, "नको वाटतें
शहरामधलें असलें जीवन
ही गर्दी, ही धांदल, गडबड
अन् यंत्रापरि झालेलें मन

दूर कुठें तरि वाटे जावें
आणि जगावें माणुस म्हणुनी
जिथें जाणवे वसंत...वर्षा
जिथें शृंखला नसती चरणीं!"

अभिमानानें आणि म्हणालिस—
"तुमच्या कविता वाचित असतें..."
नवीन झाले तुझिया अधरीं
जुनेच माझे आणि शब्द ते!

निरोप अन् घेतांना कळलें
वाट आपुली होती सरली,
नव्हती हुरहुर: आनंदाची
लकेर डोळ्यांतुनि थरथरली!

मी तंद्रींतच घरांत आलों
माझें अलगुज आणि शोधिलें
कितीक वर्षे निःशब्दच जें
धुळींत माखुनि होतें पडलें!

पुन्हा किती तरि वर्षांनीं मीं
सूर छेडिले त्याच्यावरतीं
श्वासांचें होउनियां गाणें
झुलूं लागलें तिमिरावरतीं ?

## जवळपणाचें झालें बंधन

इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

छेडणार जर होतों आपण गीत नवें तर
हवेंच होतें वीणेच्या तारांतुन अंतर
धुंदपणीं त्या...अंधपणीं त्या भान राहिलें नाहीं हें पण
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

मोहफुलांपरि तेव्हांचे ते क्षण दरवळले
गंधित उन्मद त्या अंधारीं कांहिं न कळलें
नव्हती जाणिव होइल म्हणुनी शृंखलाच हें मधु आलिंगन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

भरुनि राहिलिस तूंच माझिया नेत्रांमधुनी
निद्रेमधुनी, स्वप्नामधुनी, जागृतींतुनी,
कळलें आतां असून डोळे नव्हती दृष्टी नव्हतें दर्शन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

गुंफियलेले कर हे झाले पहा साखळ्या,
मीलन कसलें ? जें न बघूं दे दिशा मोकळ्या
खोल उरीं कुणि तडफडलें; पण जाणवलें नच तें आक्रंदन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

निकट असुनिही श्वासापुरतें दूर असावें
जवळपणांतहि पंखांना आकाश दिसावें
हवें वेगळेपण कांहींतरि मीलनांतही सखि अपुल्यांतुन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

जवळ...जवळ ये, पण सीमेचें भान असूं दे
रात्र असो, पण पहाटही वेगळी दिसूं दे
स्वरजुळणींतुनि एक गीत—तरि हवेंच अंतर सात सुरांतुन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

## अहो जग पुढें गेलें

घराघरांत घुमले तेव्हां तुक्याचे अभंग
निजलेल्या मनांतला प्रकटला पांडुरंग
अमृतातें पैजा जिंकी अशी ज्ञानेशाची ओवी
होती आणीत मनांना नवी अमृत-पालवी
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
विसरा तो जुना घोष : 'रखुमाईवरा बापा'
आतां ओठाओठावर 'लारीलप्पा लारीलप्पा'

मंगेश पाडगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थूळप्रत.
3810

आहे फार जुनी कथा पाहूनिया क्रौंचवध
वाल्मीकीच्या करुणेंत फुले अनुष्टुभ छंद...
जुन्या गोष्टी कशासाठीं ? काव्य विसरा हो राव
सध्यां रहस्यकथेला आहे बाजारांत भाव
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
आतां असें कांहीं लिहा ज्यांत सहाच पानांत
चित्तथरारक असे खून पडतील सात !

कौतुक त्या प्रतिभेचें...दगडांत निश्चेतन
जिच्या स्पर्शें अंतरींचें झालें साकार स्पंदन
सात रंगांचा सोहळा अजिंठ्याच्या पाषाणांत
उभें साकार सौंदर्य वेरूळच्या दगडांत
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
नको अजिंठा-वेरूळ मूर्ती तोडा किंवा फोडा
गाडीभोवतीं नटीच्या आतां लोकांचा गराडा

काल वाचलें कुठेंसें म्हणे कुणीसा निघाला
मागण्यास भूमीदान पायीं चालला एकला
म्हणे आत्म्याच्या शक्तीनें निर्मायची जगीं शांती
म्हणे प्रेमाच्याच पोटीं आहे दडलेली क्रांती
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
शीण पायांना उगीच कशासाठीं व्यर्थ सांगा !
लावूं तिकिटांच्यासाठीं थिएटराच्या पुढें रांगा !

आतां संस्कृती म्हणजे रेशमाचा बुशकोट
ज्याच्यावरती चित्रित हत्ती, घोडे आणि उंट
आतां संस्कृती म्हणजे लाल रंगलेले ओठ
आतां संस्कृती म्हणजे प्रचार नि जाहिरात
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
आतां तारणारा एक मंत्र जपा, मंत्र जपा :
"लारीलप्पा लारीलप्पा लारीलप्पा लारीलप्पा"

## पळवाट

नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

पाप करावें सकाळीं आणि नामजप रात्रीं
काळ्या बाजारींचें धन दान करावें सत्पात्रीं
शल्य विसरण्यासाठीं नको कांहींच का सोय ?
उभें आहे त्याचसाठीं भव्य दिव्य देवालय ! !
पाप साचलें मनांत पण बघा मंदिरांत
धूप नैवेद्य आरती आणि प्रसादाचा थाट
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट

दबलेल्या वासनांची भुतावळ छळूं लागे
मृत आशाआकांक्षांची सेना उशागत जागे
स्वप्नें सार्थ करण्याचें मनीं सामर्थ्यच नुरे
त्राण जगण्याचें सारें हाय ! पळण्यांत सरे
अशा निस्त्राण मनाला नको कांहींच का वाट ?
असो चिल्लर थिल्लर पण हवा बोलपट
किती सुखकर वाटे दोन तास अंधारांत !
दुःख वितळावें अशी जादू नटीच्या डोळ्यांत !
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

मनीं शून्यता भयाण वाटे एकांताची भीती
असो कुठेंही परंतु गर्दी हवी सभोंवतीं !
हवा प्रभावी पुढारी शब्दबाजीचा असर,
आणि व्यक्तीस पडावा व्यक्तित्वाचाच विसर !
प्रचंड त्या आवाजानें उरीं पोकळी भरावी
धुंद शब्दप्रवाहांत मुळीं जाणीव नुरावी !
सभा प्रचंड संपावी टाळ्यांचिया गजरांत
आणि घरीं आल्यावर झोप लागावी कैफांत
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

जन्म होण्यापासून तों थेट मरणापर्यंत
आहे जीवन म्हणजे एक जुगार अनंत
शिणलेल्या मेंदूसाठीं हवा कैफ कांहीं तरी
मरगळल्या नसांना हवी थोडी तरतरी !

कोण म्हणे जुगारांत आहे मनाची विकृती ?
कोड्यापासून आमुची घोड्यापर्यंत प्रगती !
रात्रंदिवस विचार घालूं 'कट' किंवा 'खट'
ध्यानीं मनीं स्वप्नीं आतां शब्दकोड्याची चौकट
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

## मज नव्हतें ठाउक

तंद्रींत आपुल्या असायचा तो जेव्हां
मज सुचतच नव्हतें दुसरें कांहीं तेव्हां
प्राध्यापक होते करीत प्रवचन कांहीं
मज शब्दहि त्यांतिल परंतु कळला नाहीं !
मी वेडी होउन टकमक पाहत होतें
मज त्याच्यावांचुन कांहीं दिसतच नव्हतें !
मी इतुकी भित्री—असें कसें मग घडलें ?
मज नव्हतें ठाउक; अजून नाहीं कळलें !

सहलीच्या वेळीं आणिक आम्ही दोघें
चालतां चालतां नकळत उरलों मागें;
वाटेंत चुकुनिया स्पर्श तयाचा झाला
अन् मनांत माझ्या गुल्मोहर मोहरला !
मी नकळे कैसी वदलें होउनि धीट :
वाटतें मज कधीं सरूं नये ही वाट !

मी इतुकी भित्री...असें कसें मग घडलें ?
मज नव्हतें ठाउक; अजून नाहीं कळलें !

त्या दिवशीं होतें संमेलन...आठवतें,
नव कृष्णवसन मी नेसुन आलें होतें;
मज पाहतांच तो स्तिमित उभा राहियला
अन् ओळ इंग्रजी कवितेंतिल पुटपुटला :
'सौंदर्ययुता ती चाले रजनीऐसी
या नक्षत्रांकित कृष्ण तलम परिवेषीं...'
क्षण पिसापरी हें शरीर हलकें झालें
अन् लहरत तरळत वाऱ्यावर भुरभुरलें !
मी हसलें आणिक गडबडलें...गोंधळलें
अन् शब्दांवांचुन सारें बोलुन गेलें !
मी इतुकी भित्री...असें कसें मग घडलें ?
मज नव्हतें ठाउक; अजून नाहीं कळलें !

त्या संध्याकाळीं सागरतीरावरतीं
रंगांची होती मैफल क्षितिजावरतीं !
पाण्यांत तरंगत होतें केशर भिजलें
वर फेनफुलांचे शुभ्र गुच्छ झुललेले !
मी करांत माझ्या कर त्याचा घेउनिया
हिंडलें स्वैर रंगांची पाहत दुनिया;
त्या रंगांहुनिही अद्भुत सुंदर किमया
रंगवीत होती क्षणाक्षणानें हृदया !
हळुहळू पसरला तम कंपित...हळुवार
अन् ओढ लागली पाण्याला अनिवार !

मज नकळे अवचित जादू कसली घडली
अन् माझ्याभवतीं मिठी तयाची पडली;
अस्तित्वच माझें गमलें एक सतार
पालवी स्वरांची फुटुनि हसे जड तार!
अधरांवर जुळतां अधर भासलें मजला
प्रत्येक क्षणाचा थरथरता स्वर झाला;

का स्वप्नच होतें जग भवतींचें सारें?
का स्वप्नच होत्या लाटा...तारे...वारे?
मी इतुकी भित्री...असें कसें मग घडलें?
मज नव्हतें ठाउक; अजून नहीं कळलें!

## कसें काय अन् कोठें चुकलें?

मी शास्त्रें हीं कोळुनि प्यालों,
असे मुखोद्गत पुराण, गीता;
ईश्वर आहे अथवा नाहीं
बसून करितों चर्चा आतां!

जाणतसें इतिहास जगाचा;
पारायण हो विज्ञानांचें;
खगोल-भूगोलादिक विद्या
माझ्या जिव्हेवरतीं नाचे!

तत्त्वज्ञानें, समाजरचना
यांतहि मी झालों पारंगत;
अर्थशास्त्र, परमार्थशास्त्रही
यांची तर नेहमिंची पंगत!

आषाढाच्या पहिल्या दिवशीं
जेव्हां जमले मेघ अचानक
पागल वारा, पागल धारा
खड्गापरि बिजलीची लखलख!

थेंब बिलोरी वेचुं लागलीं
ओणवून गवताचीं पातीं
मागें सारित केस आपुले
खट्याळ छाया भिजती न्हाती!

जमून पोरें रस्त्यावरतीं
अंगावरतीं झेलित धारा
गाउं लागलीं धुंद अनावर :
'आला पाउस—आला वारा!!'

कुणीं कोंडिली मुठींत अपुल्या
थेंबांची चमचमती दौलत
कुणीं घेतली खट्याळ गिरकी
लचकत...थबकत...झिंगत...डोलत!

मींही पाहियलें आकाशीं
पुन्हा एकदां डोळे उघडुन

ती मस्ती पण नव्हती हृदयीं
नव्हतें तसलें अद्भुत दर्शन

सहस्र धारांची ती जादू
दिसून मजला दिसली नाहीं
अणूअणूंतिल पागल धुंदी
कळली; पण जाणवली नाहीं !

आतां बसलों आहें शोधित
दीर्घ तपस्येंतहि जें हुकलें
हात कपाळा लावुनि बघतों
कसें काय अन् कोठें चुकलें !

## बरेच दिवस

बरेच दिवस
कुणासाठींच झुरलों नाहीं
बरेच दिवस
हुरहुरून फिरलों नाहीं

बरेच दिवस
खदखदून हसलों नाहीं
दूरच्या ढगांत
डोळे लावून बसलों नाहीं

बरेच दिवस
रोजची वाट चुकली नाहीं
बरेच दिवस
मनांत वीज झुकली नाहीं

बरेच दिवस
रस्त्यावरतीं थांबलों नाहीं
विसर पडून
तासन् तास बोललों नाहीं

बरेच दिवस
शीळ घालीत हिंडलों नाहीं
बरेच दिवस
माझ्यांत मीच बुडलों नाहीं

बरेच दिवस
कैफ चढून रंगलों नाहीं
बरेच दिवस
जगूनसुद्धां जगलों नाहीं

## छोरी

थबकुनि थोडी
वळुनि पुढें घाईनें

प्रौढ नि बुटक्या झाडाजवळुन जास्वंदीच्या
जाते वाट पुढें ही शाळेपाशीं...

शाळा :
चौकोनी खोकेंच चार खिडक्यांचें
रंग सफेत चुन्याचा
छप्पर लाल नळ्यांचें...

भल्या पहांटे (आठ वाजतां)
झाडांचीही नसते जेव्हां झोप संपली
सुरू व्हायची शाळा...
पहिली घंटा...
दुसरी घंटा...
सुरू प्रार्थना आणिक नंतर :
"नमण तुला गनराया
बुद्धि जागती देइ मुलां या."
...एक जांभई !

कर्कश आवाजानें नंतर हुकुम व्हायचा :
"काढा पाट्या
कुठें उजळणी
चला दाखवा..."
...माझी पाटी कोरी...
हात पुढें...
भिंगें खवचट चष्म्याचीं रोखुनिया बघती
वेत सपासप माझ्या हातांवरतीं...

किती वेळ मुसमुसून रडलों नाहीं ठाउक
आली अवचित जाग स्पर्शतां हात मऊ
मीं पाहियलें शेजारीं :
नवीन कोणी मुलगी
केस भुरे सोनेरी...
निळसर डोळे...

मीं विचारलें तिज, "नांव तुझें..."
ती खट्याळ हसली आणि म्हणाली,
"नांव ? छोरी...हात पुढें कर."
नजर खोडकर
आणिक माझ्या हातावरतीं...दुखऱ्या हातावरतीं
चिमणीच्या नाजुक दातांनीं तोडियली
फोड एक कैरीची...

फोड एक कैरीची :
अजून ताजी
जिभेवर जिची आंबट गोडी,
अजून स्वप्नीं
भुरभुरती सोनेरी कुंतल,
अजून घेते टिपुनि वेदना
नजर तिची ती निळीं खोडकर...
गिरकी घेते मनीं कलाबुत तिच्या स्वरांची :
"नांव ? छोरी...हात पुढें कर."

# सुरंगा

लाल साडिला किनार पिवळी
फुलाफुलांचा तुझा पोलका
आंगठींतला खडा किरमिजी
शब्दांहुनिही अधिक बोलका

लालचुटुक ओठांत स्मिताचें
फूलपांखरूं मिस्किल...झुलतें,
बूट उंच टांचेचे : त्यांची
मिजास तिरपी अधिकच खुलते

निळ्या, केशरी, तांबुस, पिवळ्या
रानफुलांचा घोंस कुंतलीं :
फिरायचें विसरुन वाऱ्याचीं
झुळझुळ बोटें त्यांत गुंतलीं

फूल-तुऱ्यापरि मिरवित जासी
या वाटेनें नवथर तोरा
मी माझ्याशीं उगीच हसतों,
उगीच होतों गोरामोरा !

# आहे त्याहुन

अंधार जरासा
गडद हवा होता
आहे त्याहुन...

वाऱ्याची शीळ जरा
हळुवार हवी होती
आहे त्याहुन...

वाट नागमोडीची
भिरकींत हवी होती
आहे त्याहुन...

पाण्यामधला पारा
आर्त हवा होता
आहे त्याहुन...

संकोच जरासा
फिका हवा होता
आहे त्याहुन...

...तूंही अधिक जरा
जवळ हवी होतिस
आहे त्याहुन...

# उत्तर

पंख असूनहि मुळीं न उडतें
आकाशाचें निळें कबूतर...
तसें तिच्या ओठांतच बसतें
अडून तें हटवादी उत्तर !

तिचिया भाळीं होउनिया बट
प्रश्नहि माझा खट्याळ रुळतो
किती सारिला मागें तरिही
पुन्हां पुन्हां तो तिलाच छळतो !

फितूर झाले ओठ नि डोळे
मनांत हें ती पुरें जाणते;
आषाढांतिल प्रौढ सरीची
तरीहि उसनी ऐट आणते !

कधिंतरि पडते गांठ अचानक
दोघेंहि अडखळतों, अडतों...
...हिरव्या कुरणावरुन मनाच्या
गात उन्हाचा पक्षी उडतो...!

ती हसते...पण हसतच नाहीं
अधिकच होतें घुमें कबूतर
आणि उन्हाचा पक्षी नेतो
चोचींतुनि पळवुनिया उत्तर

# विसरायाचें म्हणशिल जितुकें

विसरायाचें म्हणशिल जितुकें
तितुकें अधिकच सारें स्मरशिल
दूर जायचें म्हणशिल जितुकी
तितुकी अधिकच जवळीं येशिल

ती तिथली छायांची जाळी
अधिकच छळतिल त्या रात्री तुज...
श्वाससुगंधित हळव्या शपथा
शब्दाविण डोळ्यांचें हितगुज

पानांचा हिरवा आडोसा
थरथरणारे मनीं कवडसे...
असून ठाउक सारें सारें
ते शब्दांचे भोळे वळसे ! !

कुजबुज टिपण्यास्तव बसलेली
ओठांची चिमणी गालावर...
...ती गट्टी अन् गट्टी फू ती :
राग तुझ्या अगदीं नाकावर...

ते शब्दांचे अर्थच भलते
नको नकोला हवेंच सारें...
"छळून घे छळणार तेवढें...
...मी गेल्यावर स्मरशिल का रे ?"

धूसर ओली पहाट अन् ती
गवतावरतं दंव पडलेलें
तें चंद्राचें बुजरें कबुतर...
...घडूं नये तें अन् घडलेलें...

घडूं नये पण घडून यावें
विसरावें...पण कसें विसरशिल ?
दूर जायचें म्हणशिल जितुकी
तितुकी अधिकच जवळी येशिल ! !

## वज्रपुरुष

वज्र विजेचें वक्षावर झेलुन घेणाऱ्या
सह्याद्रीच्या उंच कड्यानें दिधली छाती
आणि घडविलें पोलादानें मनगट त्याचें
अन्यायाच्या विटा विटा उस्कटण्यासाठीं

नाठाळाच्या माथ्यावरतीं हाणूं काठी
वदणाऱ्या देहुच्या तुक्यानें दिधली वाणी
शब्दाशब्दामधून त्याच्या उसळत होतें
तलवारीचें शिवबाच्या लखलखतें पाणी

या मातीचें पुण्य असें कीं हिच्या मुलांनीं
अन्यायाच्या पुढें झुकविला कधीं न माथा

भावभावडी मराठमोळी अभंग श्रद्धा
इंद्रायणिच्या पाण्यावरतीं तरला गाथा

या मातीवर उभा राहतां वज्रपुरुष तो
अंधाराच्या साम्राज्याची पिचली छाती
आवाहन करण्यास उचलतां हात तयानें
दलित तृणांतुन उठलीं वर खड्गांचीं पातीं

राखेचेही क्षणांत झाले लाल निखारे
शून्यांतुन अन् क्रुद्ध करांचें जंगल उठलें
आणि फाटक्या सदऱ्यांमागिल क्षीण बरगड्या
दधिचीच्या अस्थींचें त्यांतुन वज्र प्रगटलें

अजून घुमते या भूमीवर त्याची वाणी
दगडालाही फुटतो अन् सूर्याचा अंकुर
आणि घडो अन्याय कुठेंही पृथ्वीवरतीं
इथल्या जनहृदयांतिल होतो जागृत शंकर

वज्र विजेचें वक्षावर झेलुन घेणाऱ्या
सह्याद्रीच्या उंच कड्याची त्याची छाती
आणि घडविलें पोलादानें मनगट त्याचें
अन्यायाच्या चिंटा चिंटा उस्कटण्यासाठीं

## मंगेश पाडगांवकर : एक दृष्टिकोन

उघडे पडून बाबा जेव्हां वाचीत असतात
दाढी लावल्या दुधीभोपळ्यासारखे दिसतात
वाचतां वाचतां अगदीं तल्लीन होऊन जातात
पुस्तक हातांत अर्ध्या तासांत घोरूं लागतात

पावसाळ्यांत गमबूट पायांत घालतात
तेव्हां बाबा गोष्टींतले राक्षस दिसतात
कामाला जातांना आपणच उशीर करतात
आणि मग उगीचच सगळ्यांवर ओरडत बसतात

बाबा तसे शूर आहेत : कोणालाच भीत नसतात
मात्र आई चिडली म्हणजे कसे अगदीं मऊ येतात
सैपाकघरांत आई गप्प ! बाबा भिऊन बोलत असतात
आम्ही आंत जातांच मात्र आम्हाला घालवून देतात !

कधीं कधीं बाबा अगदीं लाडांत येतात
व्यायाम केलाच पाहिजे म्हणून फिरायला चला म्हणतात
टॅक्सींतून घेऊन जातात, टॅक्सींतून परत आणतात
आणि आमच्या निमित्तानें आपण भरपूर भेळ खातात

"उद्यांपासून शिकवणार" म्हणून जेव्हां आवाज येतो
तेव्हां माझ्या पोटामधें भीतीनें गोळाच उठतो
शिकवीत तर कांहींच नाहींत : आरडाओरड फार करतात
काळकामाचें गणित येतांच हळूच आधीं उत्तर बघतात

कधीं कधीं आईशीं मोठमोठ्यानें भांडण करतात
दुसऱ्या खोलींत एकटेच जाऊन तणतणत झोपी जातात
मी म्हणतों, भली जिरली...आतां आई बोलणार नाहीं
खाणावळींत जेवा आतां, उद्यांपासून वाढणार नाहीं...!

पहाटे बघतों तर, बाबा आईजवळ दिसतात
अगदीं खुशाल गाढ झोपून, मजेंत आपले घोरत असतात.

## वात्रटिका

### *गायनीकळा*

एक होती बाई
ती सारखी गाई

एकदां तिच्या नवऱ्यानें
बादली भरली पाण्यानें

दार घट्ट लावून घेतलें
शीर्षासन बादलींत केलें

तरीहि ती बाई
गायची थांबली नाहीं.

### *पंडित*

एक होता पंडित
भलताच ज्ञानमंडित

वाचनाची इतकी घाई
बायकोलाही विसरून जाई

ज्ञानाचाच फक्त विचार
तरी मुलें झालीं चार

असा होता पंडित
भलताच ज्ञानमंडित.

## बंब

एक होता बंब
तो खूप तापला

तेव्हां बादली म्हणाली
हा म्हणूं नये आपला.

## खर्जे खाँ

एक होता गवई
तो नेहमीं खर्जात गाई

खर्जात गातां गातां त्याला
एक दिवस मृत्यू आला

पुन्हा जन्म मिळाला
तेव्हां तो बेडूक झाला

तरी सवय जात नाहीं
खर्जात गातो अजूनही.

## जागृति

एका माणसाला
स्वप्न पडलें

त्यानें उठून
लग्न केलें

लग्न करून
झोपी गेला

पुन्हा नाहीं
जागा झाला.

## नऊ चुका

एक होता मुका
त्यानें आधीं केल्या फक्त दोन चुका

पहिली : लावून घेतला लग्नाचा ताप,
दुसरी : लवकरच तो झाला बाप

सध्या तो मुका
बायको धरून त्याच्या एकूण नऊ चुका.

अनुक्रम 38900 दि:
क्रमांक 9580 नों दि 7/2/83

# विंदा करंदीकर

- तेंच तें
- माझ्या मना बन दगड
- धोंडया न्हावी
- सावल्या
- अजुनी ना जखम बुजे
- असेंच होतें म्हणायचें तर
- ऊन हिवाळ्यांतील शिरशिरतां
- दांतापासून दांताकडे
- कांहीं आततायी अभंग
- सदगुरूवांचोनी । सापडेल सोय
  - ज्याने केलें पुण्य । त्यानें केलें पाप
  - का रे नाडवीसी । आपुल्या मनासी
  - सद्‌गुरूची मेख । सुवर्णाची
  - अंधाराची कूस । हुंदक्यानें भरे
- शपथ तुला
- मुक्तीमधलें मोल हरवलें
- चिंधी
- पण हें श्रेय तुझेंच आहे

- घेतां
- दीपचंदी
- झपताल
- कांहीं बालगीतें
  - आजी
  - मावशी
  - परी ग परी
  - भीमाचें जेवण
- वाटाड्या
- किर्तन
- असें कांहीं पाहिलें आहे



— विंदा करंदीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३४१०० दि:
काव्य
क्रमांक ९५८० नों. दि. ११७६३

## तेंच तें

सकाळपासून रात्रीपर्यंत
तेंच तें! तेंच तें!
माकडछाप दंतमंजन;
तोच चहा, तेंच रंजन;
तींच गाणीं, तेच तराणे;
तेच मूर्ख, तेच शहाणे;
सकाळपासून रात्रीपर्यंत
तेंच तें! तेंच तें!

खानावळीही बदलून पाहिल्या;
(जीभ बदलणें शक्य नव्हतें!)
'काकू' पासून 'ताजमहाल'
सगळीकडे सारखेच हाल.
नरम मसाला, गरम मसाला;
तोच तोच भाजीपाला;
तीच तीच खवट चटणी;
तेंच तेंच आंबट सार;
सूख थोडें; दुःख फार!

संसाराच्या वडावर
स्वप्नांचीं वटवाघुळें!

या स्वप्नांचे शिल्पकार
कवी थोडे; कवडे फार.
पडद्यावरच्या भूतचेष्टाः
शिळा शोक, बुळा विनोद;
भ्रष्ट कथा, नष्ट बोध;
नऊ धागे, एक रंग;
व्यभिचाराचे सारे ढंग!

पुन्हां पुन्हां तेच भोग;
आसक्तीचा तोच रोग.
तेंच 'मंदिर,' तीच 'मूर्ति';
तींच 'फुलें' तीच 'स्फूर्ति';
तेच ओठ, तेच डोळे;
तेच मुरके, तेच चाळे;
तोच 'पलंग', तीच 'नारी';
—सतार नव्हे, एकतारी!

करीन म्हटलें आत्महत्या;
रोमिओची आत्महत्या;
दधीचीची आत्महत्या!
आत्महत्याही तीच ती!
आत्माही तोच तो;
हत्याही तीच ती;
कारण जीवनही तेंच तें!
आणि मरणही तेंच तें!

हा रस्ता अटळ आहे!
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय,
कुडकुडणारे हे जीव
पाहूं नको! डोळे शीव!
नको पाहूं जिणें भकास;
ऐन रात्रीं होतील भास;
छातीमध्यें अडेल श्वास.
विसर यांना, दाब्र कढ;
माझ्या मना बन दगड!

हा रस्ता अटळ आहे!
ऐकूं नको हा आक्रोश,
तुझ्या गळ्याला पडेल शोष.
कानांवरती हात धर,
त्यांतूनही येतील स्वर.
म्हणून म्हणतों ओत शिसें;
संभाळ, संभाळ, लागेल पिसें!
रडणाऱ्या, रडशील किती?
झुरणाऱ्या, झुरशील किती?
पिचणाऱ्या, पिचशील किती?
ऐकूं नको असला टाहो;
माझ्या मना दगड हो!

हा रस्ता अटळ आहे !
येथेंच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर.
असतात नाचत काळोखांत;
हंसतात विचकुन काळे दांत;
आणि म्हणतात, "कर हिंमत;
आत्मा वीक, उचल किंमत !
माणूस मिथ्या, सोनें सत्य;
स्मरा त्याला, स्मरा नित्य."
भिशील ऐकून असले वेद;
बन दगड, नको खेद !

बन दगड आजपासून;
काय अडेल तुझ्यावांचून ?
गालावरचें खारें पाणी
पिऊन काय जगेल कोणी ?
काय तुझे हे निःश्वास
मरणाऱ्यांना देतील श्वास ?
आणिक दुःख छातीफोडें
देईल त्यांना सूख थोडें ?
आहे दुःख तेंच फार;
माझ्या मना कर विचार;
कर विचार : हस रगड;
माझ्या मना बन दगड !

हा रस्ता अटळ आहे !
अटळ आहे घाण सारी;

अटळ आहे ही शिसारी.
एक वेळ अशी येईल
घाणीचेंच खत होईल!
अन्यायाचीं सारीं शितें
उठतिल पुन्हा; होतील भुतें.
या सोन्याचे बनतील सूळ!
सुळीं जाईल सारें कूळ.
ऐक टापा! ऐक आवाज!
लाल धूळ उडते आज;
याच्यामागून येईल स्वार;
या दगडावर लावील धार!
इतकें यश तुला रगड;
माझ्या मना बन दगड!

## धोंड्या न्हावी

कधीं कधीं मी
कोंकणांतल्या गांवीं गेल्यानंतर
जुन्या स्मृतींच्या गांधीलमाशा मजला येउन डसती,
आणिक मजला धोंड्या न्हाव्याच्या गमती आठवती.

धोंड्या न्हावी—
दोन कुडव भाताच्यासाठीं

करी हजामत सगळी अमुच्या घरची;
दादांचा तुळतुळीत चंपीगोटा,
गजाननाची ताळू राखून शेंडी
आणिक माझा 'कराप' अस्सल शहरी
अथवा दाढी (चुकवुन चांबखिळांना).

धोंड्या न्हावी—
महिन्यांतून कधीं तरि
हळूच येतो अमुच्या मागिलदारीं;
आणिक नंतर,
खोपटिच्या माघारीं जाउन करितो अद्‌भुत कांहीं,
जें न कुणींही आम्हां पाहूं देई.

धोंड्या न्हावी—
चहा न घेई चक्रम !
आहार त्याचा भक्कम;
जेवण देण्यापेक्षां
परवडतें आम्हांला देणें त्याला उचलुन रक्कम !
जेव्हां त्याला मध्येंच फुरसत होई
'खंड्या' रेडा आणिक 'चांदी' म्हैस खरडुनी जाई;
या कामास्तव त्याला न्हेरी मिळते.
निव्वळ त्याची न्हेरी
—म्हणते आई—म्हणजे एक दुशेरी

धोंड्या न्हावी—
'म्हणजे निव्वळ फत्तर,'

म्हणती आमुचे दादा,
‘एका वर्षामध्यें
लागोपाठ तयाचे
पोर वारले पटकीनें चौवेजण;
अमुचा हा धोंड्या पण
आहे तैसा आहे! बदल न बिलकुल;
एक असे मागें उचलाया तोंवर
मेला म्हणजे सुटला म्हणतों मी तर!’

धोंड्या न्हावी—
हजामतिस आल्यावर
पैसे-वसुलीसाठीं
विष्णू वाणी त्याला येउन गांठी.
करुनी थोडी थट्टा
सुरू करी तो तोंडाचा मग पट्टा:
“शरम् तुका थोडी तरि;
चार दिसाचो करून् वायदो, धोंड्या,
पोरासाठी रुपये नेलस् तेरा
आणिक् त्येका झाले चौदा महिने!
मुद्दल् जळला म्हण्तय्;
निदान देशी व्याजाच्यो दिड्क्यो तरि!
काका खोत नव्हे मी!
मी हय् विष्णू वाणी.
पैसे आणून दे नी
घेऊन जा ही नंतर् आपुली धोक्टी.”
धोंड्या न्हावी—

हात चिन्याचे नाकापुढती जुळवुन
परत म्हणतसे,
"सावकारानूं!
घेवासारे तुम्मी.
पोर वाचलो हो तुमच्या पैशावर
त्ये पैसे मी फेडिन् साक्षी ईश्वर,
झिलाक लिवूलां होतां 'पैसे पाठव'
—लिवूणारो हो तुमचो पांड्रमास्तर
त्येका तुम्ही विचारा—
त्येकाकड्सुन तुमचे
पैसे नाय इले तर
'भोरो' रेडो यिक्रीन येवूडी नांगरणी झाल्यावर."
इतक्यामध्यें
सदरा काढुन
खुंटीवरती ठेवित,
आणिक धोंदाखालीं
सरकत आलेलें खोचण वर ओढित,
दाढीवरती फिरवित हात मजेनें
काका खोत म्हणतसे,
"धोंड्या, अरे हरामा,
हा रेडा तूं विकणार तरी कितिदां ?
माझ्या व्याजासाठीं
देइन म्हणुनी कालच मजला म्हणशी;
आणिक गद्ध्या !
अगदीं माझ्यादेखत
तेंच सांगशी या विष्णू वाण्याला !"

धोंड्या न्हावी—
जातीचा ममताळु;
परंतु देशी हत्यारें तीं भेसुर !
अगदीं पहिल्यापासुन
माझ्यावरती त्याची खूपच माया.
मुंजीमधला गोटा करतांना मम
कुरवाळित डोक्याला (खरजटलेल्या),
घालित होता हळूच हलके फुंकर.
मानेवरचें तासकाम करतांना
सुसह्य सारें मजला व्हावें म्हणुनी
होता सांगत जुन्या काळच्या गोष्टी गमती नाना;
मुंजे आणिक समंध यांचा त्याचा परिचय मोठा !
भीतिकथा त्या ऐकत असतां कधींच होई गोटा.

धोंड्या न्हावी—
म्हणजे विचित्र प्राणी.
गांधिवधाच्या नंतर
लगेच दुसऱ्या दिवशीं
दाढी करतां करतां
हलक्या आवाजांत मला तो गंभीरपणें म्हणतो,
"गांधी म्येलो म्हणतत्;
लय् लय् मनांत व्होतां
या बाजुक् येतो तर
फुकट् करूची त्येची एक हजामत्."
ब्राह्मण होते भवतीं
परंतु त्यांना नव्हती

हसण्या-रडण्याची उरलेली हिंमत.
(हसणें-रडणें मुळांत एकच; अश्रूंतिल ही गंमत.)
धोंड्या न्हावी—
गेल्या वर्षीं मेला आणिक सुटला;
कोसळलें घर; उभी असे पडवी पण !
जनी बिचारी—जी त्याची मागारिण—
त्यांतच खाते उकडुन;
"माका न्हेवुन् जितीच जाळा," म्हणते;
भांडीं घासत असते;
खाते;
निजते;
उठते;
न कळे भिते कशाला,
कधीं न शिवते धोंडयाच्या धोक्टीला !
पडवींतिल एकुल्त्या खुंटीभवतीं
पिळवटुनी पिळवटुनी
अपुल्या पट्टयाचा घालुनियां विळखा
धोक्टी घेत विसावा;
डोकें टेकुन झिजक्या पाजळण्यावर
हत्यारेंही निजलीं सारीं त्यांतच होउन जर्जर

धोंडया न्हावी—
'धोंडया म्हणजे निव्वळ काळा फत्तर !'
अजुन कोणी म्हणती,
नव्हती त्याला संसारांतिल अक्कल.
धोंड्या गेला, सुटला.

कशास मजला चिंता ?
माझ्याही डोक्याला आतां पडलें विस्तृत टक्कल !

## सावल्या

सावल्या पडतात
सकाळच्या वेळीं
लांब...लांब...
जेव्हां लाजरीं
कोवळीं किरणें
गोजिऱ्या हातांनीं
करतात स्पर्श
आंब्याच्या मांडयांना,
फणसाच्या स्तनांना,
वडाच्या दाढीला !

सावल्या पडतात
सकाळच्या वेळीं
लांब...लांब...
तारुण्यांतील
स्वप्नासारख्या
सुचवीत सुचवीत
येणाऱ्या वस्तूंचे
संभाव्य आकार !

सावल्या पडतात
भर दुपारीं
खुरटलेल्या
कुब्जेसारख्या...
पायाखालीं
अडमडतात,
अडखडळतात,
चेटकिणीचीं
काळीं मांजरें!

सावल्या पडतात
संध्याकाळीं
लांब...लांब...
मोजून ठेवतात
प्रत्येक वस्तूच्या
थडग्याची लांबी!

सावल्या पडतात
संध्याकाळीं
लांब...लांब—
म्हाताऱ्याच्या
वासनेसारख्या
तेजापासून
धूम ठोकीत
पळतात, पळतात,
विरुद्ध दिशेनें

क्षितिजाकडे;
आणि शेवटीं
निरुपायानें
घेतात स्वतःचा
आकार पिंजून
अनंताशीं
एक होतांना !

सावल्या पडतात
संध्याकाळीं
लांब...लांब...
—भुतांनीं काढलेलीं
मातीवरील विचित्रें !

सावल्या पडतात
कधीं कधीं
हृदयाच्या गुहेंत;
भिंतीभिंतीवर
ठसा उठवीत
मेलेल्या, मरणाऱ्या,
विचारांचीं भुतें
भटकत असतात
उलट्या पावलांनीं !
सावल्या पडतात
कधीं कधीं
हृदयाच्या गुहेंत
आणिक आठवतात

प्लेटोच्या गुहेंतील
छायांचे नाच !
वाटतें आंतून
आपणही व्हावें
लहानशी सावली;
आणि जावें
शोधीत शोधीत
जुनाट अश्वत्थ—
ज्याच्या सावल्या
नसतात पडत
मर्त्य भूमीवर !

## अजुनी ना जखम बुजे

भातुर नजर तुझी,
भावोत्कट शब्द तुझे,
आठवती अजुनि मला;
अजुनी ना जखम बुजे.

अजुनी या विजनांतहि
प्रीतीचे स्तूप खडे :
...कललेले उंच माड ;
तुटलेले उंच कडे ;

संथ निळा खोल डोह ;
पंथ तृणांतिल हिरवा ;
निजलेल्या पाण्यावर
बगळ्यांचा शुभ्र थवा ;

नील नभा लुचणारीं
नील नील गिरिशिखरें ;
रात्रीच्या खडकांतिल
सनईचे गार झरे...

अजुनी या विजनांतहि
प्रीतीचे स्तूप खडे.
त्याजवळुन जातांना
नावडतें तेंच घडे !

## असेंच होतें म्हणायचें तर

असेंच होतें म्हणायचें तर
अशी अचानक भ्यालिस कां ?
अर्ध्या वाटेवरती जाउन
पुन्हा परत तूं आलिस कां ?

असेंच होतें म्हणायचें तर
वरवर फसवें हसलिस कां ?

स्वप्नाला चुरडून मिठींतच
पुन्हा तयावर रुसलिस कां ?

असेंच होतें म्हणायचें तर
उगाच खोटें रडलिस कां ?
भरांत येउन भलत्यासलत्या
करांत माझ्या शिरलिस कां ?

असेंच होतें म्हणायचें तर
अशी जिवाला डसलिस कां ?
केस मोकळे, ओले घेउन
वणव्यामध्यें घुसलिस कां ?

## ऊन हिवाळ्यांतिल शिरशिरतां

ऊन हिवाळ्यांतिल शिरशिरतां
स्थितप्रज्ञ काळ्या दगडावर,
—मला वाटतें क्षणभर फुटतो
दगडाला इच्छेचा अंकुर.

ऊन हिवाळ्यांतिल हळदीचें
किरिट घालतें वृद्ध वडावर !
—मला वाटतें तळ्यांत पाहुन
हात फिरवितो तो दाढीवर !

ऊन हिवाळ्यांतिल कुडकुडतें,
कुशींत शिरतें दिसतां डोंगर;
—मला वाटतें त्यालाही मग
गरम झऱ्याचा फुटतो पाझर.

ऊन हिवाळ्यांतिल भुळभुळतें
आजीच्या उघड्या पाठीवर;
—तिच्या भ्रमाला गमतें आपण
पुन्हा जरीचा ल्यालों परकर !

ऊन हिवाळ्यांतिल हिरमुसतें;
रुसतें; अन् मांळावर बसतें;
—मला वाटतें त्यालाही पण
असेंच भलतें वाटत असतें.

## दांतापासून दांताकडे

तुझी-माझी धांव आहे
दांतापासून दांताकडे

पिरॅमिडच्या दगडाखालीं
माझी छाती पिचली होती;
रंगवलेली फिक्कट 'ममी'
तेव्हांच मला हंसली होती;

तूं म्हणालास:
"फिरोहाचें बहिणीबरोबर
उद्यां लग्न लागेल काय?"
मी म्हणालों:
"पत्रावळींतलें उष्टें अन्न
परवांपर्यंत टिकेल काय?"
तो म्हणाला:
"तुझ्या-माझ्या डोक्यावरतीं
स्फिंक्झचाच दगडी पाय."
माझ्यामागें मुकीं धडें;
तुझ्यामागें मुकीं धडें;
तुझी-माझी धांव आहे
दांतापासून दांताकडे.

चीनच्या त्या भिंतीवरतीं
बुरुजागणीक भूत आहे;
दगडाच्याही अंगावरतीं
पिळणुकीची लूत आहे;
तूं म्हणालास:
"कन्फ्यूशिअसच्या झग्यावरील
कशिदा कधीं उसवेल काय?"
मी म्हणालों:
"पाठीवरच्या या कुबडाला
बुद्ध तरी फसवील काय?"
तो म्हणाला:
"संस्कृतीच्या ओठावरची

कोणासाठीं असते साय ?"
पूर्वीं झालें तेंच घडे;
इतिहासाला गेले तडे;
तुझी-माझी धांव आहे
दांतापासून दांताकडे.

यमुनेच्या काळ्या पाण्यांत
कालियाची फडा आहे;
गोरा-मोरा ताजमहाल
कांठावरती खडा आहे;
तूं म्हणालास :
"प्रीतीच्या या समाधीवर
दगडी गुलाब फुलतो आहे."
मी म्हणालों:
"यमुनेकडे ताजमहाल
थोडा थोडा कलतो आहे!"
तो म्हणाला:
अंधाराचा काळा हत्ती
पृथ्वीपुढें झुलतो आहे."
पायांखालीं काय दडे ?
नरबलीचें प्रेत सडे;
तुझी-माझी धांव आहे
दांतापासून दांताकडे.

तुझा माझा प्रवास आहे
दांतापासून दांताकडे.

काळे दांत, गोरे दांत,
किडके दांत, सडके दांत,
कांहीं शहाणे, कांहीं खुळे,
कांहीं जून, कांहीं कवळे,
कांहीं दांत पिवळे-पिवळे,
कांहीं बोलके, कांहीं मोने,
कांहींमध्यें चांदी-सोनें
तुझी माझी झेप पडे
दांतापासून दांताकडे.
पण आतां कोण रडे ?
मला एक कळलें आहे;
सुवर्णाच्या रथांत बसून
सत्य येथून पळलें आहे.
प्रत्येकाच्या छातीवरतीं
चाकोरीची खूण आहे.
जिकडे तिकडे मुकीं धडें
इतिहासाला गेले तडे;
त्यांत नवीन काय घडे ?
तुझी-माझी धांव आहे
दांतापासून दांताकडे.

क्रमांक 1520 नोंद दि. 7/2/83



१

## सद्गुरूवांचोनी । सापडेल सोय

करितों आदरें । सद्गुरुस्तवन
ज्यांनीं सत्यज्ञान । वाढवीलें,
धन्य पायथॅगोरस् । धन्य तो न्यूटन
धन्य आइन्स्टीन । ब्रह्मवेत्ता.
धन्य पाश्चर आणि । धन्य माझी क्युरी
थोर धन्वंतरी । मृत्युंजय.
धन्य फ्राइड आणि ।धन्य तो डार्विन
ज्यांनीं आत्मज्ञान । दिलें आम्हां.
धन्य धन्य मार्क्स । दलितांचा त्राता
इतिहासाचा गुंता । सोडवी जो.
धन्य शेक्स्पीअर । धन्य कालिदास
धन्य होमर, व्यास । भावद्रष्टे.
फॅरडे, मार्कोनी । वॅट, राइट् धन्य
धन्य सारे अन्य । स्वयंसिद्ध.
धन्य धन्य सारे । धन्य धन्य मीही !
सामान्यांना कांहीं । अर्थ आहे !
सद्गुरूंच्या पाशीं । एक हें मागणें:
भक्तिभाव नेणें । ऐसें होवो.
सद्गुरूंनीं द्यावे । दासा एक दान :
माझें दासपण । नष्ट होवो.

सद्गुरूवांचोनी । सांपडेल सोय
तेव्हां जन्म होय । धन्य, धन्य.

२

## ज्यानें केलें पुण्य । त्यानें केलें पाप

ज्यानें केलें पुण्य । त्यानें केलें पाप;
दोघांचाही बाप । तूंच तूंच.
ज्यानें द्यावा जन्म । त्यानें मृत्यू द्यावा;
काय तुझा कावा । तुला ठावें !
कार्यकारणानें । बांधलें सकळां
सूक्ष्मांतील कळा । तुझ्या हातीं !
नाकारितां तुला । तूंच बोलविशी;
काय माझ्यापाशीं । माझें ऐसें.
अरे, माझी इच्छा । तीही तुझी दासी;
वृथा फसविसी । कशासाठीं ?
फसवी ही इच्छा । निष्ठेचें हें ढोंग !
अंतरींचा रंग । तुला ठावें.
हाय हाय झाली । सर्वस्वाची चोरी;
निजला रे हरी । हिच्या संगें.
...बरें केलें देवा । सुटला हा पाश;
होतां सर्वनाश । नाश नोहे !

३

## का रे नाडवीसी । आपुल्या मनासी

का रे नाडवीसी । आपुल्या मनासी;
पोषितो कुणासी । जगीं कोण ?

महारोग्यापोटीं । पोरांचीं खिल्लारें;
जीवन तया रे । कोण देतो ?
कोणें केली बाळा । दुःखाची उत्पत्ती ?
वाढवी श्रीपती । पाप-पुण्य !
कोणी दिली भूक ? । कोणें दिले रोग ?
दारिद्र्याचे भोग । दिले कोणीं ?
दुःखाच्या अनंता । भोगितो संसार;
येई भागाकार । आत्मरूपें.
आत्म्याचें हें गुह्य । ब्रह्माला ना ठावें;
त्याच्या वंशा जावें । तेव्हां कळे.
जन्माच्या प्रश्नाला । मृत्यूचें उत्तर;
देई विश्वंभर । दुजें काय ?

४

## सद्गुरूची सेख । सुवर्णाची

सकाळीं उठोनी । निजवावें मन;
बनावें सज्जन । शिष्टाचारें.
भूदेवांना द्यावी । टाळींतून लांच;
दहा आणि पांच । गाठवावे.
गाठीमध्यें कांहीं । गोठवावा त्याग;
वठवावा राग । सात्त्विकांचा.
निंदावें, वंदावें । पाहोनियां वेळ;
त्यांचा ताळमेळ । बँकेपाशीं !
ताठा सोडोनियां । ताणावा पदर;
आणावा आदर । ओठावरी.

92094

'देणारा तो देव' । साक्षात्कार रोख;
सद्‌गुरूची मेख । सुवर्णाची !

५

**अंधाराची कूस । हुंदक्यानें भरे**

मूर्तीच्या माघारीं । मुर्दाड दडले;
म्हणोनि फोडिलें । फत्तरांना.
भगवे नेसले । नागड्यांचे काळ;
म्हणोनी गरळ । थुंकलों मी.
दांभिकांच्या पुढें । वळली ग्यां मूठ;
ओरडलों झूट । झूट सारें.
जगविण्या पोरा मारियला बाप;
स्वीकारले शाप । सज्जनांचे.
झालों कानफाट्या । प्रेमळा परका;
लाभला चरका । चांगल्यांचा.
अंधाराची कूस । हुंदक्यानें भरे...
—तुला तरी सारें । सांगावें का ?

## शपथ तुला

शपथ तुला जवसाची;
गोड छुप्या नवसाची;
शपथ तुला तुळशीची;
भरणाऱ्या कळशीची;
शपथ चंद्रज्योतीची
अन् काळ्या पोतीची.

शपथ सिताचौरीची;
गौरीची;
शपथ तुला तिळयांची,
रोज नव्या विलयांची,
दीर्घ दीर्घ वलयांची.

शपथ तुला स्वातीची;
समयींतिल बातीची;
शपथ तुला मोहोराची;
शपथ तुला मुरलीची;
खोल खोल श्वासांची
विजनांतिल वासांची.

शपथ तुला अंगाची,
अंगांतिल संगाची;
शपथ तुला रेतीची,
भिजलेल्या;
शपथ तुला मेंदीची,
हिरमुसल्या;
शपथ नजरबंदीची;
त्या पहिल्या धुंदीची.

शपथ तुला तहानेची;
शपथ तुला तृप्तीची;
शपथ तुला,
शपथ तुला,

शपथ तुला सरतीची,
भरतीची.

## मुक्तीमधलें मोल हरवलें

मुक्तीमधलें मोल हरवलें;
जेव्हां केलिस
गोकुळांतली पहिली चोरी
मिसळलास तूं काजळ काळा,
आणि गढुळलें मी हिमगोरी.

तुझ्या कृपेचें कृपाण प्यालें
कमळ होउनी; मधुरडंखसें;
अन् भिजलेल्या पदरामधुनी
गंध सांडला तमपुष्पाचा
तुझ्या अधाशी उग्र नखांवर.

तेव्हांपासुन साठवतें मी
आठवणीच्या परडीमध्यें
भरदार तुझ्या
छातीवरचें कुरळें पौरुष,
दंडामधली दणकट आशा,
भुवयीच्या त्या दटावणीसह.

मुक्तीमधलें मोल हरवलें
यमुनातीरीं;
शब्द हरवले, बनले मोनी,
तेव्हांपासुन, तेव्हांपासुन
साठवतें मी आठवणींतच
गोकुळांतलें दहि-दुध-लोणी.

## चिंधी

चिंधी होती कृष्णाआधीं;
चिंधी उरली कृष्णेनंतर;
काळोखाची टिचभर चिंधी
ब्रह्माचें लपवी अवडंबर.
—या चिंधीशीं जपून बोला.
सृजनापासुन सरणापावत
चिंधीचा मिचमिचतो डोळा.

या चिंधीची गांठ सुटेना;
किती ओढली तरी तुटेना;
चिंधी आहे लवचिक मोठी;
चिंधी आहे तळमळणारी;
चिंधी आहे उग्र-इमानी;
धूळ खाउनी धुळींत लिहिते
झालेल्याची नग्न जबानी.

चिंधी आहे घराघरावर,
        नग्ननिशाणी;
चिंधी आहे कुळ्ळयावरतीं,
        कंगालांच्या;
चिंधी आहे अन् पाठीवर,
        पाठराखणी.
        चिंधी आहे बरगड्यांवरी,
बरगड्यांतलें सगळें समजुन;
कधीं न फसली; कधीं न फसते;
फांस लावुनी जुन्या जगाला
नव्या जगावर भुंकत बसते !

हिमालयावर चिंधी आहे;
मिसीसिपींतहि चिंधी आहे;
आज-उद्यांची स्वप्न शिदोरी
या चिंधीची मिंधी आहे.
या चिंधीची जीभ न खळते;
पुन्हांपुन्हां मातीनें मळते;
—कल्पान्तींच्या समईमध्यें
वात होउनी खुशाल जळते.

## पण हें श्रेय तुझेंच आहे (एक मुक्तसुनीत)

अंधाराच्या मस्तीवरती रक्ताची गुळणी थुंकून
तूं मातीच्या कुशींत शिरलास.
...ह्याची मांडी मोडूं नका; हा माणूस शेवटपर्यंत उभा होता,
बुडणाऱ्या गलबताच्या डोलकाठीसारखा. ह्याच्या हाताच्या मुठी वळा;
भिऊं नका, त्याच्या हातांतील सर्व घट्टे खास त्याच्याच मालकीचे
आहेत.
त्याचें उघडें तोंड हें असें आवळूं नका, पैशाच्या पिशवीसारखें;
मेला असला तरी मवाली आहे...पटकन शिवी घालील!...
आणि असे उपचारासाठीं कवटी फुटेपर्यंत थांबूही नका;
ती अगोदरच फुटलेली आहे...
पहा उगवतीला 'फटफट'लें आहे, आणि उद्यांची ताजी बातमी
शाई पिऊन झिंगली आहे.

अंधाराच्या मस्तीवरती रक्ताची गुळणी थुंकून
तूं मातीच्या कुशींत शिरलास;
ती माती तुला विसरणार नाहीं. अन्यायाची निदान अज्ञानाला
चीड आहे.
—ह्या शेवटच्या दगडाचा आधार घेऊन एक बुरुज अजून दांत
विचकीत राहील.
तुझ्या अभावाजवळ मी अजून उभा आहें. अंधार आणि अधिक
अंधार
यांच्यामधील रित्या रेताडांत डावा पाय रोवून
मी अजून उभा आहें......पण हें श्रेय तुझेंच आहे.

# घेता

देणाऱ्यानें देत जावें;
घेणाऱ्यानें घेत जावें.

हिरव्यापिवळ्या माळावरून
हिरवीपिवळी शाल घ्यावी;
सह्याद्रीच्या कड्याकडून
छातीसाठीं ढाल घ्यावी.

वेड्यापिशा ढगाकडून
वेडेपिसे आकार घ्यावे;
रक्तामधल्या प्रश्नांसाठीं
पृथ्वीकडून होकार घ्यावे.

उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी;
भरलेल्याशा भीमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी.

देणाऱ्यानें देत जावें;
घेणाऱ्यानें घेत जावें;
घेतां घेतां एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे !

## दीपचंदी (एक तालचित्र)

रात्रीच्या वळणावरून प्राजक्ताखालीं गंधवती झालीस;
आणि पाळंदीनें एक लहानसें वळण घेतलें; त्या वाटेंवर
पुढें कितिकदां ठुमकली होतीस आणि मानेच्या
मंदारमालेंतून दोन फुलें ओघळलीं होतीं.
तेव्हां तुझें तिसरें पाऊल वाजलें नव्हतें;
तें जुईनें झेललें होतें...कशी तऱ्हेतऱ्हेची तृतीया होतीस,
आणि ओठांचा तुरा होता. वरवर पदराची सची होतीस;
आणि रक्ताची लुची होतीस. हुरासुद्धां बावरला होता.
...आंगर ओलांडतांना अल्लडशी अबोली होतीस.
तेव्हां तुझें सातवें पाऊल वाजलें नव्हतें;
तें बकुळीनें झेललें होतें...क्षितिजाच्या वळणावळणांतून
तुझ्या वळणांचा ताण होता; वेलीवरची वेलांटी होतीस;
बाधा पिऊनही साधी होतीस...
तेव्हां तुझें दहावें पाऊल वाजलें नव्हतें;
तें माझ्या उंबरठ्यानें झेललें होतें. कारण मीच उंबरठा होतों.
तुझ्या रेशमी घोळांत गळाभर गहूळलों होतों. जेव्हां अचानक
केसांमध्यें कवडसे खोवून मुखडा मिरवीत पुढें आलीस;
आणि समेवर केशराची चूळ थुंकून लयफुली झालीस.
...तेव्हां तुझें चौदावें पाऊल दंवानें ओलावलें होतें.

१९५७

## झपताल (एक तालचित्र)

ओचे बांधून पहांट उठते...तेव्हांपासून झपाझपा वावरत असतेस.
. ..कुरकुरणाऱ्या पाळण्यामधून दोन डोळे उमलूं लागतात;
आणि मग इवल्या इवल्या मोदकमुठींतून तुझ्या स्तनांवर
बाळसें चढतें. उभें नेसून वावरत असतेस. तुझ्या पोतेऱ्यानें
म्हातारी चूल पुन्हां एकदां लाल होते. आणि नंतर
उगवता सूर्य दोरीवरील तीन मुतेलें वाळवूं लागतो;
म्हणून तो तुला हवा असतो ! मधूनमधून तुझ्या पायांमधें
माझीं स्वप्नें मांजरासारखीं लुडबुडत असतात; त्यांची मान
चिमटींत धरून तूं त्यांना बाजूला करतेस. तरी पण
चिऊकाऊच्या मंमंमधील एक उरलेला घास त्यांनाही मिळतो.
तूं घरभर भिरभिरत असतेस; लहान-मोठ्या वस्तूंमध्यें
तुझीं प्रतिबिंबें रेंगाळत असतात; स्वागतासाठीं 'सुहासिनी' असतेस;
वाढतांना 'यक्षिणी' असतेस; भरवतांना 'पक्षिणी' असतेस;
साठवतांना 'संहिता' असतेस; भविष्याकरतां 'स्वप्नसती' असतेस.
...संसाराच्या दहाफुटी खोलींत दिवसाच्या चौवीस मात्रा
चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाहीं.

३० ऑगस्ट ५७

## कांही बालगीतें

१

*आजी*

कोकणांतली आजी
घाटावर आली;
कृष्णेच्या पुरांत
वाहून गेली.

न्हावतां न्हावतां
म्हातारी हसली!
मळीतलीं वांगीं
डोळ्यानां दिसली.

म्हातारी लागली
हालवायला पाय :
म्हणाली, "हीं खाल्याशिवाय
मरेन कीं काय?"

२

*मावशी*

सोलापूरहून
येते काकू;
माझ्यासाठीं
आणते चाकू.
कोल्हापूरहून

येते आत्ते;
माझ्यासाठीं
आणते पत्ते.
राजापूरहून
मावशी येते;
माझा एक
पाप्पा घेते!

३

### *परी ग परी*

'परी ग परी,
कोण तुझ्या घरीं?'
"मनी मांजरी स्वैपाक करी.'
'परी ग परी,
कोण तुझ्या घरीं?'
"उंदिर खातो श्रीखंड-पुरी."
'परी ग परी,
कोण तुझ्या घरीं?'
"पोपट म्हणतो, 'हरी, हरी.'"
'परी ग परी,
येऊं का घरीं?'
"दारांत विंचू पहारा करी!"

४

### *भीमाचें जेवण*

बकासुर ओरडला
'अलल्—डुर्र;'

भीमाने मारला
भुरका 'भुर्र'
बकासुराने
मारली थप्पड;
भीम म्हणाला,
"लोणचें फक्कड!"
बकासुराने
हाणला ठोसा;
भीम म्हणाला,
"इटली–दोसा!"
बकासुराने
बुकलली मान;
भीम म्हणाली,
"चटणी छान"
बकासुराने
हाणली ठोकर;
भीमाने दिली
एक ढेकर!
बकासुराने
मारली गदा;
भीम हसला
खदाखदा!
बकासुराला
घाम फुटला;
तेव्हा भीम
जेवून उठला!

## वाटाड्या

फार पुढें गेला असलास तर आधीं थोडा मागें फीर.
मग एकदम उजवा होऊन त्या एकलकोंड्या
उंच हवेलीच्या वासावासानें पुढें जा; तिथें तुला
जास्वंदीखालीं कोसळलेल्या झोपडीवर पांच बोटांचा
लाल ठसा उमटलेला दिसेल, अज्ञात खुनाच्या
खाणाखुणा दाखवणारा. (कदाचित् त्या काजवे गिळण्यासाठीं
चोच उघडणाऱ्या भगव्या जास्वंदीच्या चारपांच कळ्या असतील!)

तिथून तूं पुन्हा एकदां डाव्या हाताला निष्ठूर वळ,
(पूर्वीं एकदां वळला होतास तें जुनें वळण विसरून जा)
उलट्या करवतीसारखी डोक्यावर कांचा बसवलेली
मातीची मऊ भिंत बाजूला सोड; पुढें विटा भाजण्याची
भट्टी लागेल; त्यानंतर कातडी कमावण्याचा एक कारखाना
(कातडी बचावणारा) आणि टेकडीच्या कुशींत लपलेलें
शाक्तांचें महामंदिर, अणुभट्टीच्या शुभंकर आकाराचें.
तें दिसल्यावर पुन्हा एकदां उजवीकडे वळ—
उजव्या बाजूला विटलेल्या रंगाचें आकाश दिसेल.
तें दिसल्यावर पुन्हा एकदां डावीकडे वळ—
डाव्या बाजूला शिटलेल्या रंगाची जमीन दिसेल.
मग आपला नाकासमोर पुढें जा, नाक कापल्यासारखा.
चालून दमलास कीं रांगायला लाग. निब्बर ढोपरांचा
निभाव लागावा म्हणूनच वाळवंटांत वाळू असते.

## कीर्तन

नवीन मी त्या गांवीं;
वेळ कसा मग जावा!
एक न होई नाटक; येई डफ्फर क्वचित सिनेमा.
तो नच माझ्या कामा.
त्यांतुन होतें केलेलें आमंत्रण;
उगाच कां मग, सांगा, मोडावें मन?
म्हणून गेलों शोधित विष्णूमंदिर
कीर्तन जेथें हणमुबुवांचें खासें आणिक सुंदर.

"जयराम, जयराम, श्रीराम, जयराम"
"धिन् धिन् धा तिन् त्रक धिन् धागि त्रक"
भजन सुरू तर झालें.
उभें राहिलें कीर्तन.
प्रसिद्ध आणिक कर्मठ वतनी बूवा,
होते जरि म्हातारे,
अस्सल ते गाणारे:
तोंड वांकडें करुनी फिरवित आकाशांतुन डोळे,
उलट्या तानेचें मग देती फेंकुनियां भेंडोळें.
गुरव साथिचा पट्टीचा बजवय्या
साधाया सम मारित मुखडा तुकडा अथवा तिय्या, कधीं न साधा!
धा तिरकट तक् ता तिरकट तक् गुडांधा गुडांधा गुडांधा!

बूवांपुढले महाप्रतिष्ठित, वकील, डॉक्टर, सज्जन,
करीत असती धंद्याचें संभाषण:

"शहर असें हें भिकार आणिक छोटें,
इथें न कोणी धनीक मोठे वाणी !
लोक रानटी !— क्वचित भांडती वा पडती आजारी !"
अर्धवयाचे गृहस्थ गांभिर्यानें
महर्गतेचीं वा युद्धाचीं करिती नव अनुमानें.
तरुण मंडळी विद्यार्थ्यांतिल कांहीं,
मांडीवरतीं दावित गायन–ठेका,
तिरप्या आणिक आतुरशा नजरेनें
निरखित असती तरुण मुलींतिल सुंदर जी फुलराणी !

"जयराम, जयराम, श्रीराम, जयराम"
"धिं धिं धा तिन् त्रक धिं धागि त्रक"
भजन सुरू मग झालें.
टाळ्या ऐकुं न येती म्हणुनी बूवा चिडुनी गेले.
पूर्वरंग मग रंगे गहन खरोखर :
"अद्वैत असें हितकर"
"अद्वैत असें सगळें"
—उपमादृष्टांतांतच बूवा बोले—
"दोन ओठ पण वाणी एकच असते;
दोन पाय पण गति कां एकच दिसते ?
दोन कान पण श्रवणक्रीया एकच;
अद्वैताचा उगम असे द्वैतांतच.
—पितरें दोन परंतु
मूल होतसे एकच (एकावेळीं) यांत न किंतू !
विनोद सोडून घ्यावा, यांतिल तात्पर्यार्थच घ्यावा !"
प्रासादिक वाणीनें बूवा बोले;

मध्वमताचें खंडन आणिक शंकर मंडन झालें.
—पुढच्या पोरांना चिमटे घेणारीं मागिल पोरें
ऐट आणिती शांतपणानें आपण ऐकत सारें !
हरिदासाच्या पुढचे मुन्सफ नूतन
तक्क्याशीं टेकुनियां असती माना डुलवित...पेंगुन.
—घुमटीमध्यें समई तेवे, ज्योती मिणमिणारी;
—नैवेद्यास्तव उंदिर घाली मूर्तीभंवतीं फेरी;
—नैवेद्याची वाटी पिउनी तांदुळ मोजि पुजारी.

"जयराम, जयराम, श्रीराम, जयराम"
"धिन् धिन् धा तिन् त्रक धिन् धागि त्रक"
पूर्वरंग झाल्यावर
दामाजीचें आख्यान झडे सुंदर.
मार्मिक आणिक तात्त्विक आणिक सात्त्विक,
सद्धर्माला सत्कार्याला प्रेरक,
दामाजीचें जीवनः
स्पष्ट उभी मग करिती नयनांपुढतीं
दामाजीची मूर्ती :
उदारता ती, मानवता ती, ती हृदयींची कळकळ;
सत्यपरायण भगवद्‌भक्ताच्या आत्म्याची तळमळ,
पाहुन साऱ्या मंगळवेढ्यांतिल दुष्काळ भयंकर
अन्नावांचुन, पाण्यावांचुन तडफडणारी जनता;
हालांतुन चुकवाया अपुलीं मुलें मारिती माता;
दामाजीच्या हृदया फुटला पान्हा वात्सल्याचा;
आणिक त्या कानूंचीं कुलुपें तोडुन
कोठाराचीं दारें उघडत दामाजीच्या हातुन.

—आणिक शेवट लुटालूट धान्याची
—सुल्तानाच्या प्रचंड कोठाराची —
—काळाच्या जबड्यांतिल सगळ्या गिळलेल्या अन्नाची.
परिणाम पुढें भीषण :
सुल्तानाचें दामाजिस आमंत्रण;
बेडी आणिक तुरुंग आणिक दूषण
आणिक शेवट त्याच्या मुक्तीकरितां
स्वतः त्या विश्वंभर
श्रीविष्णूचें विठ्या महारांतिल अद्भुत रूपांतर !
कथा रंगली; बूवा तल्लिन झाले;
—खडीसाखरेसाठीं त्यांची मधेंच चुळबुळ चाले—
—संसारी बायांना छळती त्यांचीं रडवीं पोरें;
"घरीं नेउनी त्यांना निजवा" म्हणती त्यांचे नवरे.
लटलटत्या मानेचे तिन म्हातारे
कीर्तनरंगीं बुडून गेले सारे.
जख्खड म्हाताऱ्या विधवेचे सुरकुतलेले डोळे
पाण्यानें डबडबले.
बूवांच्या मागें बसलेल्या मराटमोळ्या जाती,
आसपासच्या खेड्यांतुन ज्या येती,
कीर्तन ऐकत असती;
विड्या ओढती; पानसुपारी खाती; थुंकत बसती.
मंदिरद्वाराजवळी वा बाहेरी,
पडक्या भिंतीभंवतीं,
अर्धउपाशी महार अथवा चांभार कुणी थोडे
भिंतीवरूनी पुढें झुकावुन माना
प्रयत्नपूर्वक ऐकत कीर्तन...जें ऐकाया ये ना.

कीर्तन संपत आलें;
शेवटची चिज चाले;
तोंडानें तिन येउन बूवा करिती शेवट साधा,
(तबला सुमधुर बोले)
धा धा तिरकिट धा ऽ धा धा तिरकिट धा ऽ धा धा तिरकिट धा.

१९४४

## असें कांहीं पाहिलें आहे

असें काहीं पाहिलें आहे—
ज्यानें दुभंगलों.
आणि उमगलें : मनामनांतून
शिवशिवणाऱ्या विराट विकलतेला
माझ्याजवळ शब्द नाहीं.
डोळ्याडोळ्यांतून थरथरणाऱ्या
पाऱ्यांतील वेदनेचा वेध घेणारा
माझ्याजवळ नेत्र नाहीं.
धुसमुसून धुसमुसून कोपऱ्याशीं स्फुंदणाऱ्या
जन्मण्यापूर्वीच निर्वासित झालेल्या
करपलेल्या, हरपलेल्या
अनाथ जगन्नाथासाठीं
माझ्याजवळ कूस नाहीं.

कूस नाहीं; माझ्यासाठींहीं कूस नाहीं.

असें कांहीं पाहिलें आहे—
भरबाजारांतील आंधळ्या गर्दीत
ऐन दुपारीं रात्रीचें दृश्य :
पत्र्यांच्या चाळींतून; अळ्यांच्या आळींतून;
हाडांच्या जाळींतून; डोळ्यांच्या बिळांतून;
माणसें सडणारीं, न मरु शकणारीं;
माणसें धुमणारीं, न पेटूं शकणारीं;
माणसें कुढणारीं, न कडाडणारीं;
असें कांहीं पाहिलें आहे—
ज्यानें दुभंगलों;
ज्यानें आलें अचानक अंधत्व
आणि आंधळ्या ईडिपसप्रमाणें
वाटलें निघावें जारपुत्रांच्या मागोमाग
विजनाच्या वाटेनें.

वाटलें असावी
माझ्याहि अंतःकरणांत समाजविषवृक्षाची
प्रदीर्घ छायाच; लांब लांब फांद्यांचा
अवजड विस्तार, कधींहि न पिकणारीं
खुरटलेलीं फळें, जळलेला मोहोर,
आणि तळाशीं

थंडावलेलें थडगें.
असें कांहीं पाहिलें आहे
ज्यानें दुभंगलों.

92-494

१२ जून ५३


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ

REFBK-0012715
REFBK-0012715





